सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# सूर्यकांत देशाचे ५३वे सरन्यायाधीश राष्ट्रपतींनी दिली 'सर्वोच्च' पदाची शपथ

## कार्यकाळ राहणार १४ महिन्यांचा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नवी दिल्ली**



सोमवारी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या पालकांच्या चरणांना स्पर्श केला, ज्यात त्यांचे कुटुंब उपस्थित होते.

शपथविधीनंतर, सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी पंतप्रधान मोदी आणि इतरांची भेट घेतली. त्यांनी माजी सरन्यायाधीश बीआर गवई यांची गळाभेट घेतली. ब्राझीलसह सात देशांचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश देखील राष्ट्रपती भवनातील समारंभात उपस्थित होते.भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच, इतक्या मोठ्या आंतरराष्ट्रीय न्यायिक शिष्टमंडळाने सरन्यायाधीशांच्या शपथविधीला हजेरी लावली. भूतान, केनिया, मलेशिया, मॉरिशस, नेपाळ आणि श्रीलंकेचे मुख्य न्यायाधीश त्यांच्या कुटुंबियांसह या समारंभाला उपस्थित होते.

सरन्यायाधीश, न्यायमूर्ती सूर्य कांत यांचा प्रवास जिद्द आणि ज्ञानाप्रती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे. हरियाणाच्या हिसारमध्ये १० फेब्रुवारी १९६२ रोजी जन्मलेल्या न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी १९८१ मध्ये हिसारच्या सरकारी पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. त्यानंतर, १९८४ मध्ये रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठातून त्यांनी कायद्याची पदवी मिळवली. २०११ मध्ये त्यांनी कुरुक्षेत्र विद्यापीठातून कायद्यातील पदव्युत्तर पदवी फर्स्ट क्लासमध्ये उत्तीर्ण केली. इतक्या उच्च पदावर पोहोचल्यानंतरही शिक्षण सुरू ठेवण्याची त्यांची तळमळ लक्षणीय आहे.

# ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे ८९ व्या वर्षी निधन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले आहे. ८९ वर्षीय त्यांनी सोमवारी दुपारी त्यांच्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा अंत्यसंस्कार विले पार्ले स्मशानभूमीत झाला, ज्यात सलमान खान, संजय दत्त, अमिताभ बच्चन आणि आमिर खान यांच्यासह अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाला एका युगाच्या अंताचे चिन्ह म्हटले आहे.

धर्मेंद्र यांच्या कुटुंबाने त्यांच्या मृत्यूची अधिकृतपणे पुष्टी केलेली नाही. दुपारी त्यांच्या घराबाहेर एक रुग्णवाहिका आली आणि विले पार्ले स्मशानभूमीत सुरक्षा वाढवण्यात आली. त्यानंतर त्यांचे पार्थिव रुग्णवाहिकेतून स्मशानभूमीत नेण्यात आले.

# भारताच्या 'दुर्गा' सीमेचं रक्षण करणार, चीन सीमेवर महिला कमांडो

## १० चौक्या उभ्या राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४नवी दिल्ली**



भारताचीचीनबरोबरची ३,४८८ किलोमीटर लांबीची दुर्गम आणि बर्फाच्छादित वास्तविक नियंत्रण रेषा (एलएसी) सांभाळणारे इंडो-तिबेट बॉर्डर पोलीस (आयटीबीपी) दल या सीमेवर लवकरच १० पूर्णपणे महिलांच्या सीमा चौक्या स्थापन करणार आहे.

आयटीबीपीचे महासंचालक प्रवीण कुमार यांनी जम्मू येथे झालेल्या ६४ व्या स्थापना दिवस परेडमध्ये ही माहिती दिली. २०२० च्या लडाखमधील लष्करी संघर्षानंतर आयटीबीपीने आपली 'फॉरवर्डायझेशन' योजना सुरू केली आहे. या अंतर्गत, आतापर्यंत २१५ सीमा चौक्या महत्त्वाच्या ठिकाणी हलवण्यात आल्या आहेत. या योजनेला बळ देण्यासाठी, केंद्राने २०२३ मध्ये आयटीबीपीसाठी ९,४०० कर्मचाऱ्यांची भरती असलेल्या सात नवीन बटालियन आणि एका सेक्टर मुख्यालयाला मंजुरी दिली आहे.

लडाखमधील लुकिंग आणि हिमाचल प्रदेशातील ठांगी येथे दोन पूर्णपणे महिलांच्या सीमा चौक्या स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय, आणखी आठ पूर्णपणे महिलांच्या चौक्या या सीमेवर लवकरच कार्यान्वित केल्या जातील, असे डीजी म्हणाले. एका लाखांहून अधिक मनुष्यबळ असलेल्या आयटीबीपीच्या चौक्या ९,००० फूट ते १४,००० फुटांपेक्षा अधिक उंचीवर आहेत. १९६२ मध्ये स्थापन झालेले हे दल केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत काम करते.

# पंकजाचं नाव आलं की अंजली दमानिया बाहेर येतात

## विरोधात बोलण्यासाठी त्या व्हेंटिलेटरवरूनही उठतील; प्रकाश महाजनांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**



डॉ. गौरी पालवे मृत्यू प्रकरणानंतर निर्माण झालेल्या राजकीय वादाला प्रकाश महाजन यांच्या तीक्ष्ण प्रतिक्रियेने आणखी उधाण आले आहे. पंकजा मुंडे यांच्या नावाचा राजकारणात वापर करून अनावश्यक टीका केली जात असल्याचा आरोप त्यांनी अंजली दमानिया यांच्यावर केला. दमानिया या केवळ पंकजा मुंडे यांच्या विरोधासाठीच प्रकरणात उडी घेत आहेत, असा दावा करत महाजन म्हणाले की, पंकजाचं नाव आलं की दमानिया बिळातून बाहेर येतात. फलटणमधील डॉक्टर आत्महत्या प्रकरणापासून बीडमधील इतर घटनांपर्यंत दमानिया दिसल्या नाहीत, पण पंकजांच्या संदर्भातील कोणत्याही मुद्द्यावर त्या अचानक आवाज उठवतात, असा आरोप त्यांनी केला. पंकजाच्या विरोधात बोलण्यासाठी त्या व्हेंटिलेटरवरूनही उठतील, अशा कठोर शब्दांत महाजन यांनी दमानिया यांच्यावर हल्ला चढवत राजकीय वातावरण अधिक तापवले आहे.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पीए अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉ. गौरी गर्जे- पालवे यांच्या रहस्यमय मृत्यूप्रकरणामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. वरळीतील घरात त्यांनी गळफास घेतल्याची घटना समोर आली असली तरी कुटुंबीयांनी हा प्रकार आत्महत्या नसून हत्या असल्याचा गंभीर आरोप केला आहे. गौरीला गेल्या काही महिन्यांपासून अनंत गर्जे आणि त्याच्या कुटुंबीयांकडून मानसिक छळ सहन करावा लागत असल्याचे तिच्या नातेवाईकांनी सांगितले. विशेषतः अनंत गर्जेचे इतर एका महिलेबरोबर संबंध असल्याचे उघड झाल्यानंतर घरातील तणाव वाढल्याची माहितीही समोर आली आहे.

अंजली दमानिया यांच्या या आरोपांना प्रत्युत्तर देताना पंकजा मुंडे यांच्या मामांनी प्रकाश महाजन यांनी जोरदार हल्लाबोल केला. पंकजा मुंडे यांचे नाव ऐकले की दमानिया बिळातून बाहेर येतात, अशा कठोर शब्दांत त्यांनी टीका केली. फलटणमधील डॉक्टर आत्महत्या प्रकरणात किंवा बीडमधील वर्गातील घटनेत त्या कुठे दिसल्या नाहीत, असा सवालही त्यांनी केला. आपल्याला पंकजा नावाचा कावीळ झाला आहे. पंकजाच्या विरोधात बोलण्यासाठी तुम्ही व्हेंटिलेटरवरूनसुद्धा उठाल, असे वादग्रस्त वक्तव्य करत त्यांनी दमानिया यांच्यावर थेट हल्ला चढवला.




# पोलिसांनी कोर्टात अनंत गर्जेचा कच्चाचिठ्ठा उघडला, महिलेच्या गर्भपाताचा पुरावा मांडला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४बीड**

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जेच्या पत्नी डॉ. गौरी गर्जे यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. वरळी येथे २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. प्राथमिक तपासात हे प्रकरण आत्महत्येचे असल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र, गौरीच्या कुटुंबियांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा आरोप केलाय. या प्रकरणात अनंत गर्जेवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून रविवारी रात्री गर्जेला अटक करण्यात आली आहे. आज अनंत गर्जेला न्यायालयात हजर केले असता त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

गौरी गर्जे आत्महत्येप्रकरणी तपास अधिकारीच गैरहजर असल्याने कोर्टाने सवाल उपस्थित केला. आरोपीचे महिलेशी संबंध असल्यामुळे आत्महत्या केली. पीएम रिपोर्ट बाकी आहे. गर्भपात लातूरच्या रुग्णालयात झाला आहे. या प्रकरणातील इतर आरोपी फरार आहेत. आरोपी पुराव्यांशी छेडछाड करू शकतात, असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. तर १० दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी वरळी पोलिसांनी मागणी केली.

आनंद गर्जेचे वकील मंगेश देशमुख माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, झालेली घटना दुर्दैवी आहे. आमचे पक्षकार पोलिसांसमोर शरण आले. सरकारी वकिलांनी दहा दिवसाची कोठडी मागितली होती. मात्र, तीन दिवसाची कोठडी दिली आहे.

# चक्रीवादळाचा इशारा, हिवाळ्यात पाऊस धुमाकूळ घालणार


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

बंगालच्या खाडीवर कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्याचे रूपांतर चक्रीवादळात होणार होईल, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे हिवाळ्यात अनेक राज्यात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तामिळनाडूच्या दक्षिण किनारी जिल्ह्यांमध्ये रविवारी मुसळधार पाऊस पडला आहे. पुढील चार दिवस काही राज्यांमध्ये पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. याचा परिणाम महाराष्ट्रावरही होणार असल्याची चिन्हे आहेत. राज्यात काही ठिकाणी तुरळक पावसाचा अंदाज वर्तवलाय. गेल्या काही दिवसांपासून राज्यातून थंडी गायब झाली आहे.दोन दिवसांपासून तामिळनाडूच्या उत्तर आणि उत्तर किनारी जिल्ह्यांमध्येही मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे अनेक भागात पाणीच पाणी झाले. २३ ते २८ नोव्हेंबर या दरम्यान अंदमान आणि निकोबारमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. २३ ते २५ नोव्हेंबर या काळात केरळमध्ये पावसाचा अंदाज वर्तवला आहे. २३, २४ नोव्हेंबर दरम्यान आंध्र प्रदेशातील लक्षद्वीप, यानम, रायलसीमा आणि तामिळनाडू, केरळमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# हिंदूनो किमान दोन मुलं जन्माला घाला, तरच हिंदू धर्म टिकेल

## अन्यथा भारतातील बहुसंख्या हिंदू संपेल: नरेंद्र महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**



जगात अनेक ख्रिश्चन आणि मुस्लीम राष्ट्र आहेत. तसेच एक हिंदू राष्ट्र असायला नको का? त्यासाठी देशातील हिंदू समुदायाने जास्तीत जास्त अपत्ये जन्माला घातली पाहिजेत, असे वक्तव्य नाणीज येथील दक्षिण पीठ रामानंदाचार्य नरेंद्र महाराज यांनी केले. हिंदूंची लोकसंख्या कमी होत राहिली तर भारतातील बहुसंख्य हिंदू संपुष्टात येतील, असे त्यांनी म्हटले. ते सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी हिंदू समाजाला किमान दोन अपत्य जन्माला घालण्याचे आवाहन केले.

भारतातील बहुसंख्य हिंदू लवकरच संपणार आहेत. आम्ही दोन आणि आमचं एक, असे हिंदू समाजाचे अपत्याबाबतचे धोरण आहे. मी हिंदू समाजाला आवाहन करतो की, तुम्ही दोन आणि किमान तुमची दोन मुलं असली पाहिजेत. तरच हिंदू धर्म टिकेल. तुम्ही एका अपत्याला जन्म देताय, हे चूक आहे. त्यामुळे हिंदूंची लोकसंख्या झपाट्याने कमी होत आहे आणि मुस्लिमांची संख्या वाढत आहे. लोकशाहीत व्होटबँकेच्या राजकारणाला महत्त्व असते. या व्होटबँकेमुळे निवडून आलेल्या व्यक्तीला महत्त्व असते. त्यामुळे भारतामध्ये हिंदूंची संख्या वाढली पाहिजे. हिंदूंनी संघटित झाले पाहिजे. तुम्ही देश, देव आणि धर्मासाठी काम केले पाहिजे. आमच्यासारखे धर्मगुरु तुम्हाला पाठिंबा देतील, असे नरेंद्र महाराज यांनी म्हटले.

# नेत्याने शपथपत्रात चौथं अपत्य लपवलं उमेदवारी रद्द होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अकोला**



अकोला जिल्ह्यातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या अकोट नगरपालिकेच्या निवडणुकीत एक धक्कादायक माहिती समोर आलीये. एमआयएमच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार फिरोजाबी शरीफ राणा यांनी उमेदवारीसोबत दाखल केलेल्या शपथपत्रात खोटी माहिती दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

१८ सप्टेंबर २००१ नंतर जन्मलेलं चौथं अपत्य लपवल्यात आलेल्या कागदपत्रांमधून स्पष्ट होत आहे. यामुळे फिरोजाबी यांच्या उमेदवारीवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झालाये. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या नियमानुसार कोणत्याही उमेदवाराला १८ सप्टेंबर २००१ नंतर तिसरं अपत्य झालं असेल तर तो निवडणुक लपविण्यासाठी अपात्र ठरतो.

अकोट नगराध्यक्षपदासाठी फिरोजाबी शरीफ राणा या एमआयएमच्या महत्त्वाच्या उमेदवार आहे. मात्र, त्यांच्या शपथपत्रात मोठी गफलत किंवा जाणूनबुजून केलेला लपवा-छपवीचा प्रयत्न समोर आलाये. शपथपत्रात एका ठिकाणी दोन अपत्य असल्याचा उल्लेख आहे. तर दुसऱ्या ठिकाणी तीन अपत्य असल्याची नोंद आहे. मात्र वास्तविक, फिरोजाबी यांना चौथं अपत्य आहे, आणि ते पूर्णपणे शपथपत्रातून लपविण्यात आलं आहे.

## संपादकीय ......

# म्हणे निवडणूक कार्यकर्त्यांची, उमेदवारी नेत्यांच्या कुटुंबातच

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सुरुवात झालेली आहे. २ डिसेंबर रोजी ४२ नगरपंचायती आणि २४६ नगरपरिषदांसाठी मोठ्या धुमधडाक्यात मतदान होणार आहे. त्यानंतर जिल्हा परिषदा आणि महापालिकांसाठी निवडणुका अपेक्षित आहेत. मुळात या निवडणुका कार्यकर्त्यांच्या असतात, असे वारंवार सांगितले जाते आणि बिंबवलेही जाते. मात्र, वास्तव काही वेगळेच आहे. भाजपचे ज्येष्ठ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अलीकडेच या स्थानिक पातळीवरील आणि कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात, त्यामुळे त्यांना संधी मिळाली पाहिजे, अशा आशयाचे वक्तव्य केले होते. प्रत्यक्षात कार्यकर्त्यांपेक्षा आमदार, मंत्री, खासदार, नेते यांच्या नातेवाईकांनाच जास्त संधी मिळाली आहे, असे लक्षात येते.

महाराष्ट्रातील अशी यादी काढली तर सत्ताधारी महायुती आणि त्यातही भाजपचा यात पहिला नंबर म्हणावा लागेल. भारतीय जनता पक्षाकडून कायम परिवारवादाचा विषय काढला जातो, गांधी घराण्यावर तसेच देशातील इतर काही घराण्यांवर आवर्जून टीका केली जाते. यात खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा उल्लेख करावा लागेल. कारण ते राजकीय घराणेशाही म्हणजेच परिवारवादावर नेहमी टीकेचे बाण सोडत असतात. मात्र, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील चित्र पाहिलं तर राजकीय घराणेशाहीला भाजपने मुळीच आक्षेप घेण्याची गरज नाही, हे स्पष्ट होईल. अलीकडेच मुंबईच्या दादर भागात एक बॅनर लावण्यात आला होता.

'ठाकरेंचा सेवक तोच मुंबईचा नगरसेवक' कुणी उत्साही कार्यकर्त्याने लावलेला हा बॅनर काही वेळातच काढून टाकण्यात आला. मात्र, या बॅनरला भाजपने बॅनर लावून उत्तर दिले होते. त्या बॅनरवर 'परिवाराचा नाही तर मुंबईचा सेवक तोच नगरसेवक' असे लिहिले होते. त्यांचा हा टोला ठाकरे बंधूंना होता. प्रत्यक्षात भाजपच्या आमदार, मंत्र्यांची यादी काढली तर नगराध्यक्षपदाची तिकिटे घरातच वाटल्याचे दिसेल. विशेष म्हणजे याला एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांचाही अपवाद नाही. मात्र, हे दोन्ही पक्षनेते घराणेशाहीवर फारसे बोलत नाहीत किंवा अपवादाने बोलतात. मात्र, भाजप वारंवार घराणेशाहीवर टीका आणि आरोप करत असल्यामुळे त्यांच्या बड्या नेत्यांनी त्यांच्याच पक्षातील यादी एकदा पाहिली तरी त्यांना 'परिवारवाद' दर्शन झाल्याशिवाय राहणार नाही.मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी जामनेरमधून नगराध्यक्षपदासाठी उभ्या आहेत तर भाजपचे दुसरे मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी भुसावळमधून नगराध्यक्षपदासाठी रिंगणात आहेत. आणखी एक मंत्री अशोक उईके यांची कन्या यवतमाळमध्ये नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत आहे. दोंडाईचा, धुळेमधून मंत्री जयकुमार रावल यांच्या आईंना नगराध्यक्षपदासाठी संधी देण्यात आली आहे. भाजपच्या अनेक आमदार, मंत्र्यांनी तसेच खासदार आणि नेत्यांनी नगराध्यक्षपदाची तिकिटे पत्नी, मुलगी, आई, बहीण यांना मिळवून दिली आहेत. लोहा नगरपरिषदेत तर एकाच कुटुंबातील सहा जणांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे. म्हणजे निवडणूक कार्यकर्त्यांची म्हणत राहायचं आणि कार्यकर्त्यांच्या नावावर घरातच उमेदवारीचे वाटप करण्याचा धंदा सुरू झाला आहे. एवढंच नाही तर याच कार्यकर्त्यांना सतरंज्या उचलायला लागतात. मग याला राजकीय घराणेशाही का म्हणू नये?

भाजपकडून अशाच पद्धतीने तिकीट वाटप केले जात असेल तर त्यांना घराणेशाही, परिवारवाद हे शब्द उच्चारायचाही अधिकार नाही. यातूनच भारतीय जनता पक्षाचे बोलणे एक आणि कृती वेगळी असल्याचे स्पष्ट होते. इकडे शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांनीही त्यांच्या अनेक आमदारांच्या कुटुंबातच नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. अजित पवार यांनीही काही वेगळे केलेले नाही. हे म्हणजे नेत्यांच्या घरात नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांच्या घरात कार्यकर्त्यांचा जन्म होण्यासारखे आहे. काही अपवाद वगळले तर अनेकदा कार्यकर्त्यांना पदे दिली जातात. अशी पदे मिळाली की कार्यकर्ते खुश होतात. ती पदे म्हणजे काय असतात, त्या पदांची जबाबदारी काय असते, याचा कुणीही विचार करत नाही.

आता देशातील विषय बाजूला ठेवून केवळ महाराष्ट्रातील राजकारणात नुसती नजर टाकली तर घराणेशाही काय असते, याचे विराट स्वरूप दिसेल. अगदी पवार कुटुंबावर नजर टाकली तरी खुद्द शरद पवार राज्यसभेत आहेत, त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे खासदार आहेत. पुतणे अजित पवार उपमुख्यमंत्री आणि सुनेत्रा अजित पवार राज्यसभेच्या सदस्य आहेत. शिवाय रोहित पवार आमदार आहेत. हे कमी म्हणून की काय युगेंद्र पवार यांची विधानसभेच्या निमित्ताने राजकीय एन्ट्री झाली आहे. मुंडे घराण्यात पाहिले तर गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर त्यांच्या मोठ्या कन्या पंकजा मुंडे पालवे राजकारणात आल्या आणि आमदार-मंत्री बनल्या, दुसर्या कन्या प्रीतम खासदार बनल्या.मुंडे यांचे पुतणे धनंजय मुंडे आमदार बनले. आता धनंजय मुंडे यांच्या बहीण नगराध्यक्षपदासाठी निवडणुकीच्या रिंगणात आहे. नवी मुंबईत गणेश नाईक मंत्री, त्यांचे पुत्र संदीप नाईक आमदार होते तर संजीव नाईक खासदार होते. तत्पूर्वी संजीव नाईक महापौरदेखील होते. पश्चिम महाराष्ट्रातीलही अनेक राजकीय घराण्यांचा उल्लेख करता येईल. पक्ष कुठलाही असो सर्वांची कामाची पद्धत सारखीच. नेत्यांचा मुलगा नेता होतो आणि कार्यकर्त्यांची मुले पुढच्या पिढीतील कार्यकर्ते बनतात, हे वर्षानुवर्षे सुरू आहे. काही अपवाद आहेत. असे अपवाद महाराष्ट्रातील राजकारणात मोठ्या प्रमाणात होण्याची गरज आहे.

# वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये वापरली जाणारी त्रीस्तरीय कटिंग पद्धत समजून घ्या!




**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक –** वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये हि कटिंग पद्धत वापरली जाते. ज्यामध्ये वेलीची वाढ विशिष्ट उंचीपर्यंत झाल्यावर सुरुवातीच्या ५-७ पानांच्या वरील सर्व उपशाखांची छाटणी केली जाते. काय आहे ही पद्धत, कशी वापरली जाते, ते पाहुयात....

**वेलवर्गीय भाजीपाला पिके : त्रीस्तरीय कटिंग पद्धत**

वेलवर्गीय भाजीपाला पिके उदा. दुधी भोपळा, दोडका, काकडी, डांगर, कोहळा यांमध्ये त्रीस्तरीय कटिंग पद्धत उपयुक्त ठरते.

पिकाची लागवड झाल्यानंतर त्या पिकाची उंची तीन ते पाच फुटापर्यंत वाढू द्यावी.

सुरुवातीच्या पाच ते सात पानांपर्यंत कोणतीही उपशाखा त्या वेलीवर येऊ देऊ नये.

उपशाखा आल्यास त्या ताबडतोब खुडून टाकाव्यात. या आलेल्या उपशाखांवर नर फुलांचे प्रमाण अधिक असते.

पाच ते सात पानानंतर येणाऱ्या उपशाखा खुडू नयेत. त्या नैसर्गिकरित्या वाढू द्याव्यात.

वेली पाच ते सात फूट उंचीच्या झाल्यावर त्याच्या मुख्य शाखेचा शेंडा खुडावा.

त्यामुळे त्याची सरळ वाढ थांबून त्यावर उपशाखा येण्यास सुरुवात होते.

आलेल्या उपशाखांवर १२ ते १५ पाने झाली की त्यांचा पुन्हा शेंडा खुडावा.

त्यावर पुन्हा उपशाखा येतील. या आलेल्या उपशाखांची पुन्हा वाढ करून घ्यावी.

या पद्धतीने मुख्य शाखा म्हणजे पहिला स्तर, उपशाखा म्हणजे दूसरा स्तर आणि शेवटी उपशाखांवर आलेल्या शाखा म्हणजे तिसऱ्या स्तराच्या शाखा होय.

या क्रमाने वेलींची वाढ करून घ्यावी.

आलेल्या तिसऱ्या स्तराच्या शाखांची वाढ चांगल्यारीतीने होऊ द्यावी. त्यावर मादी फुलांची उत्पत्ती होते.

त्यामुळे फळधारणा अधिक होऊन उत्पादनात वाढ होते.

या वेलींवर अधिक फळधारणा होत असल्याने अन्नद्रव्याचे व पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

या पिकांत विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यासाठी पिकाची विशेष दक्षता घ्यावी लागते.

**– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**




# ही हिरवी भाजी हिवाळ्यात ठरते सुपरफूड, वाचा भन्नाट फायदे

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

'चाकवत' ही पालेभाजी हिवाळ्यात बाजारात दिसू लागते. ही भाजी अनेक पोषकतत्वांनी परिपूर्ण असून आरोग्यासाठी फायदेशीर मानली जाते. विविध नावांनी चाकवत ओळखली जाते. कुठे 'चंदनबटवा' तर कुठे 'बथुआ' या नावाने ओळखली जाते. आयुर्वेदानुसार या भाजीला नैसर्गिकपणे शरीर डिटॉक्स करणारी भाजी म्हटले जाते. यात कार्बोहायड्रेट्स, फायबर, लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन ए, सी, ऍटीऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. त्यामुळे हिवाळ्यात शरीर मजबूत ठेवण्यासाठी ही भाजी अवश्य खावी, असे सांगितले जाते.



**चाकवत खाण्याचे फायदे –**

रानात मिळणारी ही भाजी फायबरने समृद्ध आहे. यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत मिळते आणि अपचन, गॅसचा त्रास होत नाही.

वेट लॉसच्या प्रयत्नात असाल तर या भाजीचा आहारात अवश्य समावेश करावा. या भाजीत कॅलरीजचे प्रमाण जास्त नसते. तसेच प्रोटिन्स अधिक असतात. त्यामुळे चाकवत वेट लॉससाठी उत्तम पर्याय आहे.

चाकवत भाजी शरीरातील रक्त शुद्ध करते आणि मऊ त्वचा मिळण्यास मदत करते. तुम्हाला मुरूमे, पुरळ अशा समस्या असतील तर चाकवत खावी.

# राजकमल पूल बंद :

## अमरावतीच्या प्रशासनिक उदासीनतेची धक्कादायक परीक्षा



अमरावतीच्या वाहतूक व्यवस्थेचा कणा मानला जाणारा राजकमल उड्डाणपूल अचानकपणे आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आणि क्षणात संपूर्ण शहर ठप्प झाले.

ऐन गणेशोत्सवात-जेव्हा शहरात मोठी गर्दी, वाढलेली वाहतूक आणि उत्सवी वातावरण असते-अशा वेळी जीवनवाहिनी ठरलेल्या पुलाचे तत्काळ बंद होणे म्हणजे अमरावतीकरांच्या दैनंदिन जगण्यावरच गदा आणणारी घटना ठरली. या निर्णयामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून प्रशासनाची भूमिकाच प्रश्नचिन्हाखाली आली आहे.

२२-२५ ऑगस्ट दरम्यान पूल अत्यंत जीर्ण स्थितीत असल्याचे सांगितले जात होते. मात्र दुचाकी, चारचाकी किंवा जड वाहनांमुळे पूल कोसळण्याची भीती व्यक्त करताना, त्याच वेळी पुलाखालून धावणाऱ्या रेल्वेगाड्यांच्या कंपनाचा काही परिणाम होत नसल्याची माहिती देण्यात आली. या परस्परविरोधी विधानांमुळे नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण झाला.पूल दुरुस्तीसाठी तो बंद करणे आवश्यकच असेल, परंतु अशा निर्णयासाठी किमान ७ ते १० दिवसांची पूर्वसूचना, पर्यायी मार्गांची स्पष्ट माहिती, वाहतूक व्यवस्थेची तयारी आणि नागरिकांना पूर्वकल्पना देणे आवश्यक होते. पण येथे या सर्वांची उघड उघड पायमल्ली झाली.

**नेत्यांचे फक्त फोटोसेशन – समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न कोठे?**

पूल बंद होताच आजी-माजी लोकप्रतिनिधी युद्धपातळीवर मैदानात उतरल्याचे चित्र दिसले. काहींनी पाहणी केली, काहींनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतल्याचे सांगितले, काहींनी माध्यमांमध्ये वक्तव्ये केली. परंतु या सर्व कृतींचा उपयोग नेमका सामान्य नागरिकाला किती झाला?उत्तर स्पष्ट आहे काहीच नाही!

अमरावतीतील नागरिक दीर्घकाळापासून अशीच तडजोड करत आहेत. नेते येतात, फोटो काढतात, दोन-चार शब्द बोलतात आणि निघून जातात. प्रशासनावर यापैकी कोणाचाच प्रत्यक्ष वचक नाही. त्यामुळे ना कामाचा वेग वाढतो, ना नियोजनात सुधारणा होते. हा पूल बंद होणे ही त्यातीलच एक सलग घटना आहे.

रविवारी रात्री १०.४२ वाजता पूल नादुरुस्त झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आणि मध्यरात्री १२ पासून सर्व वाहतुकीसाठी पूल बंद झाला. या अचानक निर्णयाचा परिणाम सोमवारी सकाळी सर्वांना झळकला.राजकमल चौक - जयस्तंभ मार्ग, हमालपुरा - रेल्वे स्टेशन मार्ग, इर्विन चौक - बडनेरा मार्ग या सर्व भागांत प्रचंड वाहतूक कोंडी झाली.अनेकांनी कार्यालयात जाण्यासाठी १०-१५ मिनिटांचा मार्ग १-२ तासांत पार केला. रुग्णवाहिका अडकल्या, विद्यार्थ्यांचे वर्ग सुटले, सार्वजनिक वाहतूक विस्कळीत झाली. नागरिकांचा संताप वाढला मात्र पुढाऱ्यांवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

अमरावतीचे आमदार सुलभा खोडके, विधानपरिषद सदस्य संजय खोडके, महापालिका आयुक्त सौम्य शर्मा आणि अन्य अधिकाऱ्यांनी तातडीची पाहणी केली.संजय खोडके यांनी सांगितले की पूल धोकादायक झाल्याबाबत दोनदा सूचना मिळाल्या होत्या, तरीही अचानक बंद करण्याची वेळ का आली? याचे उत्तर नागरिकांना कुणी दिले नाही.

**ही पाहणी फक्त औपचारिकता राहिली आहे.**

कारण पर्यायी मार्गांची शास्त्रशुद्ध आखणी नाही वाहतूक व्यवस्थेत तातडीची सुधारणा नाही

पूल दुरुस्तीचा निश्चित कालावधी जाहीर नाही

व्यापारी, विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा विचार नाही

### नागरिकांचे प्रश्न – कोण ऐकणार?

पूल बंद केल्यानंतर नागरिकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले:

पूल नेमका कसा धोकादायक झाला?

किती दिवस तो बंद राहणार?

दुरुस्तीचे काम लगेच सुरू होणार का?

पर्यायी मार्ग किती सुयोग्य आणि सुरक्षित आहेत?

ऐन उत्सवात हा निर्णय घेण्यामागील कारण काय?

यापैकी एकाचेही उत्तर नागरिकांना अद्याप स्पष्ट मिळालेले नाही.ही अमरावतीच्या बेपर्वा प्रशासनाची आणि निष्क्रिय राजकारणाची धक्कादायक परीक्षा आहे.

नागरिकांनी आता प्रश्न विचारण्याची, उत्तरं मागण्याची वेळ आली आहे.कारण पूल दुरुस्त होईल पण प्रशासनाची मानसिकता दुरुस्त होणार कधी?

# विदर्भाची भूमी ही भाषेच्या संगमाची भूमीः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नागपूर**

नागपूर हे समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेले शहर म्हणून ओळखले जाते. देशाला दिशा देणारे आणि देशाला दिशा देणाऱ्या अनेक घटनांचे साक्षीदार असलेले हे सांस्कृतिक शहर आहे. विदर्भाची भूमी ही भाषेच्या संगमाची भूमी आहे. मराठी आणि हिंदी साहित्य निर्मितीची समांतर समृद्ध परंपरा येथे पहायला मिळते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) इंडियाच्या वतीने व महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागपूर बुक फेस्टिव्हल २०२५ अंतर्गत चार दिवसीय 'झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'चे उद्घाटन रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. २३ आणि २४ तसेच २९ आणि ३० नोव्हेंबरदरम्यान हा साहित्य महोत्सव रेशीमबाग मैदानावर होत आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ वर्ध्याच्या



कुलगुरू व साहित्य अकादमीच्या उपाध्यक्षा डॉ. कुमुद शर्मा, लेखक व शिवकथाकार विजयराव देशमुख, झिरो माईल यूथ फाउंडेशनचे मार्गदर्शक सत्यनारायण नुवाल, अध्यक्ष अजय संचेती, संचालक समय बनसोड उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, येथे गोंड राजांनी सार्वजनिक ग्रंथालयाची परंपरा सुरू करून ज्ञानसंस्कृती रुजवली. भोसले काळात हिंदवी स्वराज्याच्या विस्तारात नागपूरने मोलाची भूमिका बजावली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य हे अभिजात आहे. नागपूर विदर्भातील अनेक साहित्यिकांनी या संस्कृतीला समृद्ध करण्याचे काम केले आहे.

# अमरावती महानगरपालिकेची कारवाई, एका दिवसात २२.०३ लाखांची मालमत्ता कर वसुली



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती,**

अमरावती महानगरपालिकेने मालमत्ता कर थकबाकीदारांवर गारद घालत आज उत्तर झोन क्र.१ मधील मालमत्ता कर वसुल रु.९.७७, मध्य झोन क्र.२ मधील मालमत्ता कर वसुल रू.१.७३, पुर्व झोन क्र.३ मधील मालमत्ता कर वसुल रू.३.४६, दक्षिण झोन क्र.४ मधील मालमत्ता कर वसुल रु.४.३३, पश्चिम झोन क्र.५ मधील मालमत्ता कर वसुल रु.२.७३ असे एकूण २२.०३ लाख रुपयांची प्रभावी वसुली केल्याची माहिती समोर आली आहे.

शहरातील विविध प्रभागांमध्ये विशेष मोहीम राबवत पथकांनी थकबाकीदारांना नोटिसा देऊन तत्काळ देयक भरण्याची कारवाई केली.

महापालिकेच्या कर विभागाने सकाळपासून संध्याकाळपर्यंत शहरातील व्यावसायिक व निवासी मालमत्ता धारकांकडून वसुली मोहीम तीव्र केली. थकबाकीदारांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी पथकांनी घरपोच जाऊन थकीत कराची माहिती दिली व तत्काळ भरणा न केल्यास जप्तीची कारवाई करण्याचा इशारा दिला.

या मोहिमेत कर विभागाच्या अधिकाऱ्यांसह पथकांनी समन्वय साधून थकबाकी वसूल करण्यात यश मिळवले. पुढील काही दिवसांतही अशीच मोहीम सुरू राहणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी वेळेवर मालमत्ता कर भरणे आवश्यक असल्याचे आवाहनही मनपा प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

## शिरजगाव मोझरीच्या गावकऱ्यांचा निर्धार ....

# यावेळी उमेदवारी मिळेपर्यंत मागे हटणार नाही!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ शिरजगाव मोझरी**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिरजगाव मोझरी गावात अनोखी एकजूट दिसून आली आहे. अनेक वर्षांपासून काँग्रेसकडून गावाला उमेदवारी न मिळाल्याचा मनातील खदखद आता उफाळून आली असून, गावकऱ्यांनी यावेळी ठाम आवाज उठवला आहे.

गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांच्याकडे उमेदवारीची विनंती केली. त्यांच्या मागणीला गावातील सर्वपक्षीय नेते, तरुणाई, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकदिलाने पाठिंबा दिला.शुक्रवारी पार पडलेल्या बैठकीत गावकऱ्यांचा सूर अत्यंत भावनिक होता.गावासाठी काम करणाऱ्या माणसाला संधी द्या, आमचा आवाज नजरेआड करू नका! शिरजगाव मोझरीला यावेळी न्याय मिळालाच पाहिजे!

गेल्या कित्येक वर्षांपासूनच्या अपेक्षांना आता उमेदवारीच्या रूपाने प्रतिसाद मिळावा, अशी गावाची सामूहिक भावना आहे. या एकजुटीमुळे काँग्रेससमोर मोठे आव्हान उभे राहिले असून, शिरजगाव मोझरीची ही



निर्णायक भूमिका आगामी निवडणुकीत महत्त्वाची ठरणार आहे. आजपर्यंत गावाला राजकीय नेतृत्व मिळाले नाही. आज गावात पक्षाची उमेदवारी मिळाल्यास पक्षपात न करता एकमताने गावातील उमेदवारा ला मतदान करता येईल. त्यामुळे काँग्रेसने यावेळी उमेदवारी देतांना जात-पात न बघता गावात उमेदवारी दिल्यास काँग्रेसचा विजय होऊ शकते.-सुरेश येरणे, गुरुदेव सेवा मंडळ शिरजगाव मोझरी.

> गावातील उमेदवार लायक आहे. गावाला यातून नेतृत्व मिळू शकते. काँग्रेसने गावात तिकीट दिल्यास एकमताने गावातील उमेदवाराचा मागे उभे राहणार आहे. उमेदवारी मागण्यासाठी सुद्धा ताकतीने मागणी करणार आहे.- विजय कुरळकर, सामाजिक कार्यकर्ते यापूर्वी पंचायत समितीची उमेदवारी मागितली होती. त्यावेळी उमेदवारी देण्याचे आश्वासन देऊन येन वेळी उमेदवारी रद्द केली. काँग्रेस पक्षाकडून वेळोवेळी उमेदवारीसाठी शिरजगाव मोझरी दुर्लक्षित आहे. यावेळी तरी काँग्रेसने गावात जिल्हा परिषद उमेदवारी द्यावी . गावात उमेदवारी दिल्यास एकजुटीने काँग्रेसचा विजय करून दाखवू
>
> **- निरंजन कडू, सरपंच, शिरजगाव मोझरी**

> राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराचे वारस शिरजगाव मोझरी आहे. आमच्या गावातील एकोपा आम्ही वेळोवेळी दाखवला आहे. यापूर्वी सुद्धा गावातील उमेदवाराला बहुमतच दिले आहे. त्यामुळे यावेळी जिल्हा परिषदेची उमेदवारी काँग्रेसने शिरजगावात दिल्यास संपूर्ण गाव गावातील उमेदवाराच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार आहे.
>
> **- प्रकाश चिचखेडे, गावकरी-**

# जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षा सुरळीत

## जिल्हाधिकाऱ्यांची परीक्षा केंद्रांना भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,**

जिल्ह्यात रविवारी ३६ केंद्रांवर महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत जिल्ह्यात पेपर एकसाठी ५ हजार ८६५ तर पेपर दोनसाठी ९ हजार ३६५ नोंदणी केली. यापैकी पेपर एकसाठी ५ हजार ५३० तर पेपर दोनसाठी ८ हजार ८५६ परीक्षार्थींनी परीक्षा दिली. ही परीक्षा सर्व केंद्रांवर सुरळीतपणे पार पडली.जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज जिल्हा परिषद कन्या शाळा, ज्ञानमाता हायस्कूल आणि होली क्रॉस शाळा येथील शिक्षक पात्रता परीक्षा केंद्राला भेट दिली, तसेच ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सूचना केली. श्री. येरेकर यांनी परीक्षार्थींना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषद कन्या शाळा येथील केंद्रालगत जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचे काम सुरू आहे. या ठिकाणी बांधकामाचा आवाज होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी सदर काम परीक्षा काळात बंद ठेवण्याचे



निर्देश दिले. त्यानंतर त्यांनी होली क्रॉस आणि ज्ञानमाता हायस्कूल येथील परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. यावेळीही त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत येणाऱ्या परीक्षार्थींना परीक्षेसाठी बसू देण्याची सूचना केली. परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींचे आधार कार्ड आणि प्रवेश पत्र तातडीने तपासण्यात यावे, त्यांना वर्ग खोल्यांमध्ये प्रवेश देण्यात यावा. परीक्षेदरम्यान परीक्षार्थींना कोणतीही अडचण होणार नाही किंवा बाधा येणार नाही, याची काळजी घेण्याची निर्देश दिले.सदर परीक्षा आयोजनाचे काम जिल्हा संनियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आणि उपाध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. परीक्षा संचालन व्यवस्थित व्हावे, यासाठी केंद्रसंचालक, सहाय्यक परिरक्षक, झोनल अधिकारी व परीक्षेशी संबंधित सर्व यंत्रणा होती. जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय व शिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत परीक्षेचे संपूर्ण संनियंत्रण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आली. सर्व परीक्षा केंद्रांवर निगराणीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले.जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी व योजना शिक्षणाधिकारी कार्यालयाचे भरारी पथकाव्दारे परीक्षा केंद्रांना भेटी देण्यात आल्या. संपूर्ण परीक्षा पारदर्शक व शिस्तबद्ध होण्यासाठी परीक्षार्थींची बायोमॅट्रिक, स्क्रिनिंग व फेस रिकगनिशन प्रक्रिया राबविण्यात आली.

## १४ मिनिटांत १०० पाढे बिनपाहता!

# चांदूर रेल्वेच्या प्रवीण पुंड यांची इंटरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्डमध्ये धमाकेदार नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चांदूर रेल्वे :**

४डॉ. सी. व्ही. रमण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चांदूर रेल्वे येथे कार्यरत असलेले वरिष्ठ लिपिक श्री. प्रवीण पंजाबराव पुंड यांनी विलक्षण स्मरणशक्ती आणि आश्चर्यकारक गणिती कुवतीच्या जोरावर थेट इंटरनॅशनल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये आपले नाव नोंदवून चांदूर रेल्वे शहराचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरवाने झळकावले आहे.

प्रवीण पुंड यांनी 'श्री क्वार्टरचा पाढा' (३/४ चा गुणाकार) हा १ ते १०० पर्यंत चढत्या व उतरत्या क्रमाने, तसेच प्रत्येक रांग डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे-अशा सर्व प्रकारांनी केवळ १४ मिनिटे १८ सेकंदात, तेही बिनपाहता, निर्विवादपणे म्हणून दाखवला.गणितातील मानसिक चपळाईचा हा दुर्मिळ नमुना पाहून परीक्षक थक्क झाले आणि या पराक्रमाची अधिकृत



नोंद इंटरनॅशनल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली.या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य, सहकारी शिल्पनिदेशक आणि संपूर्ण कर्मचारीवर्ग यांनी प्रवीण पुंड यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.गणित विषयातील त्यांची निपुणता, मानसिक वेग आणि स्मरणशक्तीवरची अविश्वसनीय पकड पाहता विद्यार्थी व युवकांसाठी ते प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे येत आहेत.प्रवीण पुंड यांचा हा विक्रम गणितातील मानसिक वेग, स्मरणक्षमता आणि लक्ष केंद्रीकरणाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून नोंदला गेला असून चांदूर रेल्वे शहरासाठीही हा एक अभिमानाचा क्षण ठरला आहे.

# ओला कंपनीचे ईव्ही घ्याल तर वाहन जाईल भंगारात

## सर्व्हिसिंग सेन्टरचा झाला बट्ट्याबोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती-** इंधन महागडे असल्यामुळे नागरिकांनी इलेक्ट्रॉनिक्स वाहनांना पसंती देत ही वाहने खरेदीकडे कल वाढला आहे. मात्र ओला कंपनीच्या वाहनांना वर्ष, दोन वर्षात या वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात बिघाड आला असून ऑनलाइन सर्व्हिसिंगचा बट्ट्याबोळ झाला आहे. सर्व्हिसिंग केंद्राच्या परिसरात ओलाची शेकडो वाहने भंगारात पडून असून दुरुस्ती होण्याचा पत्ता नाही. या केंद्रावरून वाहनधारकांना योग्य उत्तर मिळत नाही. लाख, दीड लाखांचे हे वाहन खरेदी करूनसुद्धा दुरुस्तीसाठी येरझारा माराव्या लागत आहेत.

ओला ईव्ही वाहनाची मार्केटिंग करताना कंपनीने मोठमोठे आमिष दाखविले होते. 'सब कुछ ऑनलाइन' असे म्हणत ग्राहकांना भुरळ पाडली. हे इलेक्ट्रिक वाहन हे बाहेरून देखणे आणि वेगवेगळ्या रंगात उपलब्ध असल्याने अनेकांनी ते ऑनलाइन खरेदी केल्यात. मात्र वर्ष, दीड वर्षातच अनेकांना



ओला ईव्ही वाहनांचे वास्तव जाणवू लागले आहे. चार्जर कनेक्शन पॉइंटमध्ये दोष असल्याच्या सर्वाधिक तक्रारी आहेत. २ ते ६ महिन्यांपासून अनेक वाहने ही सर्व्हिसिंग केंद्राच्या बाहेरच बेवारस पडून आहे. ही वाहने दुरुस्त करणारे मॅकेनिकल बाजारात उपलब्ध नसल्याने वाहनधारकांना कंपनीच्या सर्व्हिसिंग केंद्राशिवाय पर्याय नाही, हे वास्तव आहे. अशी स्थिती राज्यभरात असून, ओला वाहनांची समस्या सोडविणे ही काळाची गरज ठरू लागली आहे.

# 'पुन्हा एकदा उमेदवारी कापणाऱ्यांचे धन्यवाद!'

## भाजप पदाधिकाऱ्याने थेट मुख्य चौकात बॅनर लावून पक्षाचे काढले वाभाडेच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अकोला :**

कुठलीही निवडणूक म्हटली की प्रमुख पक्षांकडून निवडणूक लढणाऱ्या इच्छुकांची गर्दी असते. त्यातील एकाला संधी मिळाल्यावर पक्षांतर्गत नाराजी नाट्य रंगणे काही नवीन नाही. वाशीममध्ये मात्र, एका इच्छुकाची उमेदवारी कापल्याने खमंग राजकीय चर्चा होत आहे. पदाधिकाऱ्याने मुख्य चौकात थेट बॅनर लावून मनातील खदखद व्यक्त करीत प्रमुख नेते व पक्षाचे वाभाडेच काढले.

वाशीम येथील भाजपच्या अभियंता सेलचे पदाधिकारी धनंजय घुगे यांनी हे पाऊल




उलचलले. 'पुन्हा एकदा उमेदवारी कापणाऱ्यांचे, धन्यवाद!, असे ठळक अक्षरात नमुद करून एकनिष्ठ कार्यकर्ता कायम राहील. पद व सत्तेसाठी हपापलेला नाही, हे दर्शवण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल देखील आभार,' असा जोरदार टोला सुद्धा लगावला आहे. भाजपांतर्गत नाराजी, तिकीट वाटपातील घोळ पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला.बहुप्रतिक्षित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा मुहूर्त निघाला अन् नगर पालिका व नगर पंचायत निवडणुकीचा बिगुल वाजला. अनेक वर्षांपासून इच्छुकांना स्थानिक निवडणुकीची प्रतीक्षा लागली होती. इच्छुकांनी त्यासाठी तयारी देखील केली होती. निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेदवारी नाट्य सुरू होते. उमेदवारी अर्ज दाखल करणे, छाननी व अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याने आता अंतर्गत नाराजीचा दुसरा अंक सुरू झाला. वाशीम नगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपचे स्थानिक पदाधिकारी धनंजय घुगे यांनी उमेदवारी मागितली होती. पक्षाने त्यांना उमेदवारी दिली नाही. यामुळे त्यांनी नाराज होत थेट शहरातील मुख्य भागात बॅनर लावून स्थानिक नेते व पक्षावर निशाणा साधला आहे. आपली उमेदवारी कापल्याबद्दल त्यांनी संबंधितांचे आभार मानले.

> **या कारणाने लावले बॅनर**
>
> धनंजय घुगे यांनी बॅनर लावण्यामागील भूमिका स्पष्ट केली. 'मला उमेदवारी नाकारल्यानंतर माझ्याविषयी माझ्या प्रभागात अनेक अफवा पसरत होत्या. पक्षाने मला उमेदवारी नाकारली आणि ती नाकारल्यामुळे मी पक्षांतर करेल किंवा पक्षविरोधी काम करेल, अशी चर्चा होत होती. तसे काहीही नाही हे स्पष्ट करण्यासाठी बॅनर लावले,' असे त्यांनी सांगितले.

# खासदार डॉ. बोंडे यांना दुसऱ्यांदा धमकीचा 'कॉल'

## राजापेठ पोलिसांनी वरूड येथून घेतले युवकाला ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

खासदार डॉ. अनिल बोंडे यांना रविवारी अनोळखी व्यक्तीने फोन करून शिवीगाळ केली आणि धमकी देत खूप महागात पडेल, असे म्हणत फोन बंद केला. याप्रकरणात राजापेठ पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून मोबाईलचे लोकेशन घेतले आणि सायंकाळपर्यंत त्याला वरुड येथून अटक केली. देवेंद्र रामभाऊ खेरडे (वय ४५, रा. वरूड) असे धमकी देणाऱ्याचे नाव आहे. तो भाजपचाच कार्यकर्ता असल्याचे समजते.याप्रकरणात राजापेठ ठाण्यात गुन्हा दाखल असून पोलीस फोन करणाऱ्याच्य शोधात आहेत. पोलिसांच्या हाती काही ठोस माहिती लागली नाही. दरम्यान रविवारी (दि.२३) सकाळी पुन्हा खासदार डॉ. अनिल बोंडे यांना पुन्हा अनोळखी मोबाईल नंबरवरून फोन आला आणि फोन करणाऱ्या व्यक्तीने शिवीगाळ करीत धमकी दिली. तसेच तुला खूप महागात पडेल



असे म्हणत मोबाईल बंद केला.

घटनेनंतर डॉ. बोंडे यांनी प्रथम त्यांचे स्विय सचिव रवीकिरण शरदराव वाघमारे यांना हा प्रकार सांगितला. तसेच सायबर पोलिसांना फोन करून हा घटनाक्रम सांगितला, त्यानंतर रवीकिरण वाघमारे यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. घटनेची गंभीर दखल घेत सायबर पोलिसांनी तत्काळ फोन करणाऱ्या व्यक्तीच्या नंबरची माहिती घेतली असता वरुडयेथे राहणाऱ्या हर्षली नावाच्या महिलेच्या नावावर सीम असल्याचे स्पष्ट झाले. राजापेठ पोलिसांचे एक पथक सकाळीच वरुडला रवाना झाले. दिवसभर पोलिसांनी संबंधित मोबाईल धारकाचा शोध घेतला, परंतु काही माहिती मिळाली नाही. अखेर सायंकाळी पोलिसांना मोबाईलचे लोकेशन मिळताच पोलीस महिलेच्या घरी पोहोचले. चौकशी केली असता संबंधित मोबाईल नंबर महिलेचा पती देवेंद्र हा वापरत असल्याचे तिने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी देवेंद्र खेरडेला ताब्यात घेतले आणि विश्वासात घेऊन विचारपुस केली असता त्याने फोन केल्याची कबुली दिली. परंतु कुठल्याच प्रकारची धमकी दिली नाही. डॉ. अनिल बोंडे हे आमच्या मतदार संघातील आहेत आणि त्यांच्याकडे काम होते. परंतु त्यांनी काम केले नाही. त्यामुळे कामाबाबत विचारपुस केली आणि महागात पडेल असे म्हटले, अशी कबुली संबंधित व्यक्तीने दिली.भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांना आठ दिवसांपूर्वी एका अनोळखी व्यक्तीने फोन करून शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली होती.

# हजारो पर्यटकांनी शनिवार, रविवार लुटला गुलाबी थंडीचा आनंद

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प, चिखलदरा व इतर पर्यटनस्थळांवर गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. २४मेळघाट–** दिवाळी झाली तशी थंडीला सुरुवात झाली. काही दिवसांच्या तुलनेत यंदा थंडीही काहीशी कमी झाली, त्यामुळे जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटन व धार्मिक स्थळे पर्यटकांनी गजबजायला लागली. जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी नागरिक त्यांच्या वाहनाने कुटुंबासह शनिवार व रविवारी घराबाहेर पडताहेत. यात हिल स्टेशन चिखलदरा, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सेमाडोह, अप्पर वर्धा धरण, मालखेड येथील पक्ष्यांसाठी प्रसिद्ध सरोवर, येथील बांबू गार्डन, मुक्तागिरी, लासूरचे आनंदेश्वर मंदिर, सालबर्डी अशा पर्यटन व धार्मिक स्थळांचा समावेश आहे. थंडीला सुरुवात झाली की, चिखलदरा, मेळघाटचे सौंदर्य खुलते. धुक्याच्या चादरीने हा परिसर वेढला जातो. चिखलदऱ्यातील भीमकुंड, किचकदरी, वैराट देवी, सुर्यास्त पॉईंट, बीर धरण, पंचबोल पॉईंट येथील निसर्गाने उधळण केलेले सौंदर्य, येथील खाद्य पदार्थ, आल्हाददायक वातावरण पर्यटकांना आकर्षित करत आहे. सेमाडोह व्याघ्र प्रकल्प, हत्तीची सफारी, रात्री तंबूत वास्तव्य हा एक आनंद आहे. त्यामुळे येथे



पर्यटक येत आहेत. सातपुडा पर्वतरांगेच्या दक्षिण बाजूला असलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पात हिवाळयात वाघ, अस्वल, बिबट,चंदेरी अस्वल, तृणभक्षी प्राणी, पक्षी पाहण्याची चंगळ असते. थंडीत प्राणी पाणवठ्यांजवळ येतात, त्यामुळे त्यांना पाहणे सोपे होते. चिखलदरा येथे गाविलगड किल्ला आहे. पचबोल पॉइंट दऱ्या, टेकड्यांचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी हा पॉइंट आहे. चिखलदऱ्यामध्ये मेघदूत हे उद्यान आहे. गुरुकुंज मोझरी येथे संत तुकडोजी महाराजांची समाधी , मुक्तागिरी मंदिर हे धार्मिक स्थान आहे. बांबू गार्डनमध्ये विविध प्रकारचे बांबू, कॅक्टसची झाडे आहेत. वडाळी तलाव, अप्पर वर्धा धरण मोर्शी तालुक्यातील सिंभोरा येथे आहे. येथे निसर्गाची शांतता अनुभवता येते.दर्यापूर जिल्ह्यातील लासूर येथील आनंदश्वर शिव मंदिर हे शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असून ते वरच्या बाजुने उघडे असल्याने येथे ऊन, सावलीचा खेळ बघण्यासारखा असतो. त्याचप्रमाणे सालबर्डी येथेही निसर्गरमणीय ठिकाणी शिव मंदिर असून नदी, नाला, उंच सखल रस्ता, घनदाट वृक्षांमधून मार्ग काढत भुयारात असलेल्या या मंदिरापर्यंत जावे लागते. येथील निसर्ग सौंदर्यासोबतच कच्चा चिवडा, बोरकूट खाण्यासाठी पर्यटक येथे भेट देतात.

# अतुल पुरी खून प्रकरणातील फरार आरोपी अखेर जाळ्यात

## अमरावती गुन्हे शाखेची मुंबईत धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती :**पो.स्टे. बडनेरा हद्दीतील अतुल पुरी हत्या प्रकरणातील तिन महिन्यांपासून फरार असलेला मुख्य आरोपी अखेर अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मुंबईच्या चेंबूर परिसरातून अटक केला आहे. गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईमुळे प्रकरणातील तपासाला मोठी गती मिळाली आहे. दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी तिलकनगर रोडवर अतुल ज्ञानदेव पुरी (रा. पुंडलीकबाबा नगर, अमर कॉलनी, अमरावती) हे बारीपुरा मार्गे बडनेरा रेल्वे स्टेशनकडे जात असताना सकाळी सुमारे ९ वाजता अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करून त्याची हत्या केली होती. या प्रकरणी पो.स्टे. बडनेरा येथे अप.क. ४१३/२०२५, कलम १०३(१) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद झाला होता.या गुन्ह्याचा समांतर तपास करताना गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पथकाने यापूर्वीच पाच आरोपी आणि तीन विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेऊन गुन्हा उघड केला होता. मात्र प्रमुख आरोपी अक्षय प्रदिप शिंपी (वय ३० वर्षे, रा. गणेडीवाल




लेआऊट, कॅम्प, अमरावती) हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. त्याचा मागोवा घेण्याचे काम गुन्हे शाखेचे पथक सातत्याने करत होते.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हे शाखेला गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की अक्षय शिंपी हा मुंबईच्या चेंबूर परिसरात लपून बसला आहे. प्राप्त माहितीवर तातडीने प्रतिक्रिया देत निरीक्षक संदीप चव्हाण यांनी सपोनि महेश इंगोले यांच्या पथकाला मुंबईला रवाना केले.चेंबूर परिसरात मोठ्या शिताफीने सापळा रचून पथकाने आरोपी अक्षय शिंपी याला ताब्यात घेतले. आज रोजी त्याला पुढील तपासासाठी पो.स्टे. बडनेरा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय व गुन्हे रमेश धुमाळ, तसेच शिवाजी बचाटे (सपोआ, गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कारवाईत सपोनि महेश इंगोले, पोलीस अमलदार गजानन देवले, मंगेश परिमल, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, संग्राम भोजने, योगेश पवार, संदीप खंडारे व प्रभात पोकळे यांनी मोलाची भूमिका बजावली.अमरावती गुन्हे शाखेच्या या यशस्वी ऑपरेशनमुळे अतुल पुरी हत्येच्या तपासात महत्त्वाची प्रगती झाली असून उर्वरित पुराव्यांच्या आधारे गुन्ह्याचा संपूर्ण उलगडा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.–

# राज्यात पडली थंडी, कडाडली अंडी, शहरात बॉईल अंडा २५ रु प्लेट ने विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** राज्यातील काही भागात मोठ्या प्रमाणावर थंडी वाढली असून त्यामुळे एकीकडे अंड्यांना मागणी प्रचंड वाढली आहे. त्यामुळे अंड्याचे भाव कडाडले आहेत. थंडीत अंड्यांना सकस आणि उब देणारा आहार म्हणून पाहिले जाते. कोंबडीच्या अंड्यांना थंडीत प्रचंड मागणी असते त्यामुळे पुरवठा आणि मागणी यांच्या संतुलन बिघडून अंड्याचे दर थंडीत कडाडतात. आता राज्यातील अंड्यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.रविवारी २५रु प्लेट ने बॉईल अंडा विक्री करण्यात आला. अंडी खाणाऱ्यांसाठी वाईट



बातमी आहे. अंड्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. मागणी जास्त आणि पुरवठा कमी झाल्याने अंड्याचा तुडवटा झाला आहे.त्यामुळे अंड्यांचे दर वाढले आहेत. महाराष्ट्रात अंड्याचे दर ऐतिहासिक स्तरावर पोहचले आहे. मागणी वाढल्याने अंडी महागल्या या व्यापारातील तज्ज्ञ सांगतात. अंड्यांच्या कमतरता आणि वाढत्या किंमतीमुळे लोकांचे टेन्शन वाढले आहे.त्यांना आता जास्त पैसे मोजून अंडी खरेदी करावी लागणार आहेत. अंड्यांचा पुरवठा नियमित होण्यासाठी अन्य राज्यांना अंड्यांचा पुरवठा वाढवण्यास सांगण्यात आले आहे.

# पोरगव्हानमध्ये शेतातील गोठ्याला भीषण आग

## लाखोंचे साहित्य जळून खाक, शेतकरी अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील पोरगव्हान येथे शेतातील गोठ्याला लागलेल्या भीषण आगीत लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. ही घटना रविवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली.

पोरगव्हाण येथील शेतकरी रामचंद्र महादेवराव सातव यांनी मौजा धामणगाव येथील सर्वे नं. ६६५ मधील गव्हाच्या पिकाला पाणी सुरू करून ते घरी गेले होते. दरम्यान, शेजारील शेतातील मजुराने सातव यांना त्यांच्या गोठ्याला आग लागल्याची माहिती दिली. माहिती मिळताच सातव यांनी शेताकडे धाव घेतली; परंतु तोपर्यंत गोठ्यातील संपूर्ण साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते.

या आगीत शेतकऱ्याचे स्प्रिंकलर संच,



डीएपी खताची ५ पोती, मोटर स्टार्टर, झटका मशीन, फवारणीची औषधे व इतर शेतीस उपयोगी साहित्य असे मिळून अंदाजे एक लाख रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे, अशी माहिती सातव यांनी दिली.

आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे शेतकरी सातव यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांनी शासनाकडे तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, नुकतेच गव्हाच्या हंगामाचे काम सुरू असताना झालेल्या या आगीत त्यांची शेती व्यवस्थापनाची संपूर्ण तयारी उद्ध्वस्त झाली आहे. स्थानिकांनीही ही घटना दुर्दैवी असल्याचे सांगत प्रशासनाने त्वरित पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

# शहरात सोनसाखळी चोरट्यांचा कहर

## ४५ ग्रॅम सोनं लुटलं, तीन ठाण्यात गुन्हे नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–**

शनिवारी सायंकाही केवळ २३ मिनीटांत तीन महिलांच्या गळ्यातील ४५ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना उघडकीस आली. या तिन्ही घटनेत पोलिसांनी गुन्हा दाखल करून सोनसाखळी लुटारूंचा शोध सुरू केला आहे. तसेच एकाच रात्री सलग तीन घटना घडल्यामुळे पोलीस यंत्रणा खडबडून जागी झाली आहे.

बडनेरा जुनीवस्ती येथील दत्त कॉलनी येथे राहणाऱ्या शोभगुणवंतराव ठवकर (वय ६२) याशनिवारी (दि.२२) सायंकाळी नातीसह मंदिरात दर्शनाला गेल्या होत्या. दर्शन करून पायी घरी जात असताना ६.३० वाजताच्या सुमारास मागून स्पोर्ट्स बाईकवर दोन युवकआले आणि महिलेच्या गळ्यातील ८ ग्रॅमचे मंगळसूत्र हिसकावून पळून गेले. महिलेने आरडाओरड केली परंतु क्षणातच दोघेही दिसेनासे झाले. घटनेनंतर लगेच महिलेने बडनेरा ठाण्यात तक्रार दिली. यानंतर बाईकस्वार भरधाव अमरावतीच्या दिशेने निघून गेले. दरम्यान कृष्णापर्ण कॉलनी निवासी सीमा सुरेश मुरारका (वय ६२) या घरी पायी जात असता सायंकाळी ६.४० च्या सुमारास दुचाकीवर आलेल्या



दोघांनी महिलेच्या गळ्यातील २५ ग्रॅमचे मंगळसूत्र हिसकावले आणि भरधाव निघून गेले.याबाबत महिलेने राजापेठ पोलिसांना माहिती दिली तेव्हा लगेच पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहचला. त्यानंतर सायंकाळी ६.५३ वाजता मोतीनगर येथे–राहणाऱ्या प्रणाली आशीष कदम (वय ४०) या शंकर लॉन्ड्री येथून जात असतांना लुटारूंनी त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅमचे मंगळसूत्र हिसकावून भरधाव निघून गेले. महिलेने आरडाओरडा केली असता नागरिकांनी धाव घेतली, परंतु दोघेही दुचाकीने पसार झाले. त्यानंतर महिलेने फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दिली. या तिन्ही घटनेत पोलिसांनी वेगवेगळे गुन्हे दाखल करून सोनसाखळी लुटारूंचा शोध सुरू केला आहे. तसेच तीन्ही घटनास्थळावरील व आसपासचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पोलीस कसून पाहणी करीत आहेत. मात्र अद्यापही पोलिसांच्या हाती कुठलाच सुगावा लागलेला नाही.

# नगरसेवकांना ३.५० लाख रुपये खर्चाची मर्यादा

## नगराध्यक्षपदाच्या प्रचारासाठी ११.२५ लाख रुपये खर्च करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** – नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या निवडणूक खर्चात वाढ करण्यात आली आहे. वाढलेली महागाई आणि प्रचार खर्चाचे वास्तव लक्षात घेऊन निवडणूक आयोगाने सुधारित दर लागू केले आहेत. त्यानुसार, आता नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला आपल्या प्रचारावर ११ लाख २५ हजार रुपये खर्च करता येणार असून, नगरसेवक पदासाठी ३ लाख ५० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे. ही माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विकास खंडारे यांनी दिली. दर्यापूर शहरातील 'क' दर्जा पालिकेच्या निवडणुकीला वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्ष आपापल्या पद्धतीने मोर्चेबांधणी करत आहेत. थंडीच्या लाटेसोबतच शहरात निवडणुकीचा ज्वर वाढत असल्याचे चित्र आहे. निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या मर्यादेनुसार सर्वच पक्षांना नियमांचे काटेकोर पालन करावे लागणार आहे.प्रत्येक उमेदवाराला आपला



रोजचा निवडणूक खर्च संबंधित यंत्रणेकडे लेखी स्वरूपात सादर करणे बंधनकारक आहे. वाढलेल्या खर्चाच्या मर्यादेमुळे प्रचार साहित्याच्या खर्चिक बाबी सांभाळणे उमेदवारांना शक्य झाले आहे. तरीदेखील, उमेदवारांनी आपले आर्थिक व्यवहार कायदेशीर चौकटीत ठेवून निवडणुकीतील खर्चाचे नियमन करावे, अशा निवडणूक यंत्रणेच्या सूचना आहेत. नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराने सव्वा अकरा लाखांपेक्षा अधिक आणि सदस्य पदाच्या उमेदवाराने साडेतीन लाखांपेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी असे कळविण्यात आले आहे.या निवडणुकीत काही सामाजिक कार्याची आवड असणारे नवीन चेहरे, तर काही अनुभवी नेते नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे.आदर्श आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी निवडणूक विभागाच्या वतीने विविध पथकांची स्थापना करण्यात आली आहे. यात तीन स्थिर पथके, एक फिरते पथक आणि एका व्हिडिओ चित्रीकरण पथकाचा समावेश आहे. प्रत्येक पथकात एक पोलिस कॉन्स्टेबल आणि व्हिडिओ चित्रीकरण करणारा कर्मचारी आहे.

# दर्यापूर येथे २७ नोव्हेंबर रोजी श्री विजय ग्रंथ महापारायण


### विद्याताई पडवल–उजवने (ठाणे) यांचे ग्रंथ वाचन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४दर्यापूर**

दर्यापूर येथे गेल्या ८ वर्षापासून सुरू असलेले संत गजानन महाराज श्री विजय ग्रंथ महापारायण सोहळ्याचे यावर्षी सुद्धा भव्य आयोजन करण्यात आले आहे.

दर्यापूर शहरातील तरुण उत्साही मंडळाचे मैदान,माहेश्वरी भवन,अकोट रोड येथे दिनांक २७ नोव्हेंबर गुरुवार रोजी सकाळी ७ वाजता पासून सुप्रसिद्ध विजयग्रंथ मुखोदगत वाचक विद्याताई पडवल–उजवने(ठाणे) यांच्या अमृत वाणीतून करण्यात आले आहे.तर दुपारी २ वाजता महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.तरी या श्री विजय ग्रंथ महापारायण सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वाचकांनी विजय ग्रंथ सोबत आणावा, पारायण नियोजित वेळेवर सुरू होईल, स्वयंसेवकांनी(पुरुष) पांढरा वेष धारण करावा, महिलांनी शक्यतो लाल साडी परिधान करावी असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहिती करिता



मो.९४२३६४८९२७, ८६६९०१५७६०, ९१६८१११९९४, ९८५०५९०५५३, ९७६३८५७२७२ यावर संपर्क साधावा असे कळविण्यात आले होते.तरी या श्री विजय ग्रंथ महापारायण सोहळ्याचा सर्व संत गजानन महाराज भाविक भक्तांनी पारायण सोहळा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा,असे आवाहन संत शिरोमणी गजानन महाराज भक्त परिवार दर्यापूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# हॅपी स्ट्रीट्स; फिटनेस, सामाजिक जागरूकतेचा संगम

## 'सनडे बनवा फनडे,' आबालवृद्धांचा मोठा सहभाग, वाहनमुक्त रस्त्यावर गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** मोर्शी रोडवरील वेलकम पॉइंट येथे रविवारी आयोजित करण्यात आलेल्या हॅपी स्ट्रीट्स अमरावती या उपक्रमाने शहरात उत्साह, आनंद आणि आरोग्याचा नवा संमिश्र अनुभव दिला. 'सनडे बनवा फनडे' या संकल्पनेला नागरिकांनी प्रतिसाद देत रविवारी २३ नोव्हेंबरला पहाटे ६ वाजतापासूनच वाहनमुक्त रस्त्यांवर गर्दी केली.

हॅपी स्ट्रीट्स अंतर्गत फिटनेस, मनोरंजन आणि कुटुंबासाठी उपयुक्त असे अनेक उपक्रम आयोजित केले. वेगवेगळ्या झोनमध्ये रनिंग, ॲरोबिक्स, योगासने आणि इतर फिटनेस सत्रांचे आयोजन केले गेले. प्रशिक्षित झुंबा प्रशिक्षक कविता शेंडे यांच्या नेतृत्वात झालेल्या झुंबा सत्रांनी सर्व वयोगटातील नागरिकांना संगीताच्या तालावर थिरकवत सकाळी नवचैतन्य दिले.लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना सहभागी करणारे विविध खेळ, मनोरंजन उपक्रम, इंटरॲक्टिव्ह ॲक्टिव्हिटीजमुळे परिसरात आनंदी वातावरण निर्माण झाले.

शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलच्या मेरा भारत स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागरिकांनी स्वच्छता कशी बाळगावी,आत्मरक्षा, मर्दानी खेळ, मुलींनी आपले सरक्षण स्वतः कसे करावे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्या प्रेरनेने प्रात्यक्षिक करून दाखवले. नागरिकांनी या दोन्ही प्रात्यक्षिकांचे कौतुक करून मुलांना शिवाजी आयडियल इंग्लिश स्कूलचे नाव विचारत शाळेमध्ये हे छान उपक्रम घेतात



व पुढील रविवारलाही यावे, अशी विनंती केली. यामध्ये सहभागी विद्यार्थी आराध्या सगणे, जान्हवी उकिणकर, दृष्टी ठाकूर, दाक्षणी काळे, ईश्वरी ढोणे, सिद्धी नवघरे, प्राजक्ता राऊत, आरोही धोटे, मधुरा म्हसाळ, अक्षदा अत्तरकर , श्रुती खंडारे, लावण्या भेले, राधिका काकळे ,कृष्णाली आगळे, देवराज जगताप, स्वरीत मेहरे, साहिल लुल्ला, अरीन संदीप यावलकर, तसेच शाळेचे क्रीडा शिक्षक अमर खंडारे ,मंदार मडावी, शाळेच्या मुख्याध्यपिका वैशाली ठाकरे, पर्यवेक्षिका शारदा फुले यांच्या मार्गर्शनाखाली तयार झाले.

अशा उपक्रमांमुळे शहरात आरोग्यदायी व सकारात्मक सकाळीचा नवा संस्कार निर्माण होत, असल्याचे अनेक नागरिकांनी सांगितले.

रविवार सकाळचा मोर्शी रोड पूर्णपणे उत्सवमय, कुटुंबप्रधान दिसत होता. पालक, मुले, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी सर्वांनी मिळून चालणे, सायकलिंग, नृत्य, खेळ व विविध उपक्रमांचा मनसोक्त आनंद घेतला. अनेक कुटुंबांनी सांगितले की,अशा उपक्रमांनी ताणतणावमुक्त जीवनशैलीला चालना मिळते आणि कुटुंबातील नातेसंबंध मजबूत होतात.

# अमरावतीमध्ये राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत लक्षवेधी नाटके सादर

## टाकरखेडा संभूच्या संस्थेची महिलांची भूमिका असलेली सखी ग सखी नाट्यकृती लक्षवेधी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६४ व्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरी अंतर्गत आज, रविवारी 'सखी गं सखी' हे नाटक सादर झाले. फक्त महिलांचा समावेश असलेल्या या नाट्याद्वारे रसिकांना नोकरदार महिलांच्या वेगवेगळ्या भूमिकांची ओळख झाली. संवाद प्रधान असलेले हे नाटक आहे.

पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज परिसर येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात नेहमीप्रमाणे सायंकाळी ७ वाजता नाटकाचा प्रारंभ झाला. नाट्य प्रयोगाच्या सुरुवातीला रंगमंचावर एक 'टॉक शो' सुरू असतो. तो केवळ स्त्रियांसाठी आणि स्त्रियांच्या अनुभवावर आधारित असतो. या कार्यक्रमाची सूत्र संचालिका प्रगल्भ आणि समजूतदार आहे. स्त्रीच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक प्रवासातले सत्य, माध्यमांचा प्रभाव आणि स्त्रीच्या प्रतिमे वरचा परिणाम, संघर्ष, वाट बघणं, प्रामाणिकपणा आणि आकांक्षा यांचा ताळमेळ दाखवण्याचा प्रयत्न या नाटकातून सादर करण्यात आला.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही राज्य नाट्य स्पर्धा सुरु असून रंगभूमीची मध्यवर्ती संघटना असलेल्या अ. भा. नाट्य परिषदेचे विश्वस्त ड. प्रशांत देशपांडे, नाट्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष ड. चंद्रशेखर डोरले आणि समन्वयक विशाल फाटे त्यासाठी स्थानिक पातळीवर परिश्रम घेत आहेत.

छोट्या गावातील संस्थेची नाट्य निर्मिती भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभू या छोट्याशा गावातील समर्पण बहुउद्देशीय संस्था या नाटकाची निर्मिती आहे. डॉ. पराग घोंगे यांनी या नाटकाचे लेखन केले असून दिग्दर्शन किशोर पाचकवडे यांचे आहे. यात आंचल गजभिये, सोनू तारपुरे, काजल देशमुख, मयुरी राणे आणि प्रियांका नवाथे यांनी अभिनय केला आहे. नेपथ्य रिंकू सरोदे, पार्श्व संगीत प्रज्वल तायडे, प्रकाशयोजना सागर उदासी, रंगभूषा रवीना भुरभुरे आणि वेशभूषा कुंदाताई वंजारी यांनी केली आहे.

# माहुली जहागीरच्या सरपंचांना 'सर्वोच्च' दिलासा

## प्रीती बुंदीले सरपंचपदी राहणार कायम उच्च न्यायालयाच्या आदेशावर स्थगिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४माहुली जाहगीर**

माहुली जहागीर ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रीती बुंदीले यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा आणि निर्णायक दिलासा मिळाला आहे. ग्रामपंचायतीत निर्माण झालेल्या अनिश्चिततेला सर्वोच्च न्यायालयाने पूर्णविराम देत त्यांना सरपंच पदावर पुन्हा सर्व अधिकारांसह कायम राहण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे.



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने लाच प्रकरणात ४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रीती बुंदीले यांना अपात्र ठरवणारा आदेश दिला होता. या निर्णयाविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात तात्काळ याचिका दाखल केली होती. सुनावणी दरम्यान त्यांच्या बाजूने अ‍ॅड. निलेश गावंडे यांनी सखोल आणि ठोस कायदेशीर युक्तिवाद सादर करत उच्च न्यायालयाच्या आदेशावर स्थगिती देण्याची मागणी केली. या युक्तिवादाला मंजुरी देत न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाचा आदेश स्थगित ठेवत 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याचे निर्देश शुक्रवारी दिले. या निर्णयामुळे प्रीती बुंदीले यांचे सरपंच पद अबाधित राहणार असून ग्रामपंचायतीचा सर्वसाधारण प्रशासनीक कारभार पूर्ववत सुरू राहणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून पसरलेल्या अशांतता व अफवांनाही या निकालाने पूर्णविराम मिळाला आहे. ग्रामस्थांनी या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत करत न्यायालयाने योग्य हस्तक्षेप करून न्याय दिला, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.. सरपंचपदावरील स्थिरतेमुळे ग्रामविकासाची कामे नव्या जोमाने गतिमान होतील, असा विश्वासही ग्रामस्थांनी व्यक्त केला असून खा. डॉ. अनिल बोंडे, आ. राजेश वानखडे,आ. रवी राणा, भाजप नेत्या नवनीत राणा,विवेक गुल्हाने यांनीही या निर्णयाचे स्वागत करत प्रीती बुंदीले यांना शुभेच्छा दिल्यात.

# 'टीईटी' विरोधात ५ डिसेंबरला शिक्षकांचा महामोर्चा; शाळा राहणार बंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

सर्व शिक्षकांना टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) अनिवार्य करण्यात आल्यामुळे लाखो शिक्षकांच्या नोकरीवर संकट निर्माण झाले आहे. या संकटातून मार्ग काढण्याऐवजी राज्य सरकारकडून जबाबदारी झटकण्याचा प्रकार पाहायला मिळत आहे. टीईटीविरोधात ५ डिसेंबरला महामोर्चा व शाळा बंद आयोजित केला आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठकीत यात एकजुटीने सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात आला.

उत्तर प्रदेश, उत्तराखंड, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आदी राज्य सरकारांनी टीईटी सक्तीविरोधात कायदेशीर पावले उचलली असताना एकट्या महाराष्ट्रात पुनर्विचार याचिका दाखल करण्यासाठी कायदेशीर अडचण सांगितली जात आहे.

सरकारने याबाबत ठोस भूमिका घ्यावी, या मागणीसाठी राज्यभरातील शिक्षक ५डीसेंबर रोजीशाळा बंद ठेवून मोर्चा काढणार आहेत. या मुद्द्यावर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक पार पडली. यामध्ये ताकदीने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा कार्यकारिणी बैठकीत राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर व जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार यांनी केले.

जे शिक्षक त्या-त्या वेळेच्या सर्व शैक्षणिक व्यावसायिक पात्रता, अटी-शर्ती पूर्ण करून सेवेत लागले, त्यांना अचानक टीईटीची पात्रता पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे व ती पुढील दोन वर्षात उत्तीर्ण न केल्यास नोकरीतून काढून टाकणे हे कोणत्याही सुजाण नागरिकास न पटणारे आहे. रोजगारासोबतच हा प्रश्न शिक्षणाच्या अस्तित्वाचा आहे, असे जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र दहातोंडे यांनी स्पष्ट केले.जिल्हा सभेच्या अध्यक्षस्थानी शिक्षक समितीचे जिल्हा नेते गोकुलदास राऊत होते. जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, कोषाध्यक्ष नंदकिशोर पाटील, महिला आघाडी प्रमुख सरिता काठोळे, सहसचिव मनीष काळे, जुनी पेन्शन सेलचे प्रेमसुख ठोंबरे, सरचिटणीस नीलेश कांडलकर, कोषाध्यक्ष पंकज दहीकर, शिक्षण विस्तार अधिकारी राजकुमार वसुले, गजानन कावलकर, शेख अनिस, राजेंद्र निंभोरकर, जयेश दाभाडे, सागर वाकोडे, इलियास खान उपस्थित होते.

# सीसीआयच्या नऊ केंद्रांवर केवळ १० हजार क्विंटल कापसाची खरेदी

## जिल्ह्यात अवकाळी पावसाने पांढऱ्या सोन्याचा दर्जा खालावला; भावही कमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४बुलढाणा**

सीसीआय तर्फे जिल्ह्यातील ९ केंद्रांवर शेतकऱ्यांचे पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाची खरेदी सुरु करण्यात आली आहे. या ९ केंद्रावर मात्र एकूण १० हजार क्विंटल पर्यंतच खरेदी आता पर्यंत करण्यात आल्याची माहिती आहे.

केंद्रावर पांढऱ्या सोन्यातील आद्रतेचे प्रमाण तपासून त्याला भाव देण्यात येत आहे. यंदा जिल्ह्यात बोटावर मोजण्याइतके खासगी व्यापाऱ्यांकडून पांढऱ्या सोन्याची खरेदी करण्यात येत आहे. हे खासगी व्यापारी पांढऱ्या सोन्यात आद्रतेचे प्रमाण अधिक असल्याचे कारण पुढे करून सीसीआय पेक्षा ३०० ते ४०० रुपये प्रति क्विंटल कमी भाव देऊन या कापसाची खरेदी करीत आहे.भाव कमी असल्याने कापूस उत्पादक शेतकरी खासगी व्यापाराऱ्याकडे पाठ फिरवत आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे पांढऱ्या सोन्याचा दर्जा खालावला असून त्यामुळे जिल्ह्यातील खासगी व्यापारी पांढरे सोने खरेदी करण्यास पुढे आलेले नाही. कापूस उत्पादक शेतकरी हा गेल्या काही वर्षांपासून हळूहळू आता सोयाबीन उत्पादन घेण्याकडे वळत आहे. पांढऱ्या सोन्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत असल्याने शेतकरी हळूहळू पांढऱ्या सोन्याचा पेरा कमी करत आहे. यंदा दसऱ्याच्या पांढरे सोने शेतकऱ्यांच्या घरात आले नाही.

जिल्ह्यात केवळ ९ खरेदी केंद्र बुलडाणा जिल्ह्यात यंदा सीसीआयच्यावतीने केवळ ९ केंद्र सुरु कली आहे. यात जळगाव जामोद, मलकापूर, नांदुरा, देऊळगावराजा, देऊळगाव मही, चिखली, शेगाव, खामगाव व बुलडाण्याचा समावेश आहे. येथे प्रत्येकी १ केंद्रावर १० ते १५ दिवसांपासून तर खामगाव येथील ४ केंद्रांवर ३ नोव्हेंबर २५ पासून पांढऱ्या सोन्याच्या खरेदीला प्रारंभ करण्यात आला आहे. यामध्ये औदर्या ग्रो इंडस्ट्रीज या केंद्रावर ८२४ क्विंटल, अंकुर कोटेक्स प्रायव्हेट लिमिटेड या केंद्रावर ७११ क्विंटल,भारत जिनिंग अ‍ॅग्रो या केंद्रावर १९८० क्विंटल व सुगोसा कॉटन प्रायव्हेट लिमिटेड केंद्रावर ५४७ क्विंटल खरेदी केला.

वातावरणातील आर्द्रतेमुळे घटवले व्यापाऱ्यांनी भाव शेतकऱ्यांनी सीसीआय केंद्रावर आणलेल्या कापसाची आद्रता मशीनच्या साह्याने मोजण्यात येते. त्याप्रमाणे पांढऱ्या सोन्याला भाव देण्यात येत आहे. १० टक्के आद्रता असलेल्या कापसाला ७ हजार ८९८ रुपयांचा भाव. ११ टक्के आद्रता असलेल्या कापसाला ७ हजार ८१८ रुपये तर १२ टक्के आद्रता असलेल्या कापसाला ७ हजार ७३७ रुपये प्रतिक्विंटल भाव सीसीआय तर्फे देण्यात येत आहे.

# भाज्यांचे भाव वाढल्याने गृहिणींना चिंता ८० रुपये किलो बहुतांश भाज्यांचे भाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

भाज्यांची हिवाळ्यात रेलचेल असते. तसेच भाव देखील आवाक्यात असतात परंतु यंदा अती पावसामुळे बागायती शेतीवर परिणाम झाला. त्यामुळे आवक कमी आहे. त्यामुळे दर वाढले. पत्ता कोबी फक्त चाळीस रुपये किलो आहे बाकी भाज्या ऐंशी, शंभर रुपये किलोने विकत घ्यावे लागत आहेत। हिरवे कांदे, मुळा, मेथी, टोमॅटो, काकडीचा सलाद तसेच वांग्याचे भरीत, हिरव्या मिरच्यांचा ठेचा असा बेत या दिवसात असतो. थंडीच्या दिवसात खाण्यापिण्याची चंगळ असते. परंतु बाजारात महागाई डोकावू लागली की हात आखडता घ्यावा लागतो. याला कारण सध्याचे भाव. फुलकोबी, पालक, मेथी ऐंशी रूपये किलो, गवार शेंगा, ढेमसे एकशे वीस रुपये किलो, टोमॅटो साठ रुपये किलो या प्रमाणे भाज्यांचे भाव आहे. त्यातही हद्दवाढ भागात किलो मागे दहा रुपये अधिक मोजावे लागतात.

# ड्रोन कॅमेऱ्याने वाघाचे शोधकार्य; वन विभागाची चमू मुक्कामी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पथ्रोट**

वाघडोह (शहानूर)येथे पहिल्या दिवशी वाघाने जंगली डुकराची शिकार केल्याची घटना उघडकीस आल्यावर त्याच रात्री ती शिकार पळवून नेल्यानंतर वन विभागाची टीम त्या गावात मागील सहा दिवसापासून मुक्कामी आहे. ड्रोन कॅमेराच्या साह्याने वाघाचे शोधकार्य करीत आहे. आता त्यांच्या मदतीला अमरावतीहून रेस्क्यू टीमही पोहचली असल्याने वाघाच्या जेरबंदीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वाघडोह गावाच्या जवळ रायपूर, चौर्यामल शेतशिवारामध्ये एका कपाशीच्या शेतात पिकाला पाणी देत असताना समोरून वाघ जंगली डुकराची शिकार जबड्यात धरून घेऊन जाताना तेथे उपस्थित असलेल्या रवि राजने या शेतकर्याला दिसला होता. दोघांची नजरानजर झाल्यानंतर त्याने शिकार सोडून राजने यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. तो पळून गेल्याने सुदैवाने त्याचा जीव वाचला. घटनेची माहिती वनविभागाला दिल्यानंतर त्यांनी आपल्या टीमसह तात्काळ घटनास्थळ गाठून शिकार झालेल्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावले होते. ज्यामध्ये शिकार घेऊन जाताना रात्री बारा वाजताच्या दरम्यान वाघ कॅमेर्यात कैद झाला होता.घटनेचे गांभीर्य जाणून वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी मागील सहा दिवसापासून गावात मुक्काम करत दिवस-रात्र वाघाचे शोधकार्य सुरू केले आहे. अशातच दोन दिवसानंतर एका शेळीची शिकार झाल्याने पुन्हा एकदा ट्रॅप कॅमेरे लावत वाघ की बिबट याचा शोध घेणे सुरू झाले आहे. शोधकार्यात मदत मिळावी याकरिता त्यांनी ड्रोन कॅमेराद्वारे पाहणी सुरू केली आहे. एवढेच नव्हे तर आता त्यांच्या मदतीला हिंस्र प्राणी जेरबंद करणारी अमरावती येथील रेस्क्यू टीम सुद्धा पोहचली आहे. त्या टीमने सुद्धा घटनास्थळाची व परिसराची संपूर्ण पाहणी करून पुढची रणनीती आखली आहे.

# चिंचोना गायमुख महादेव मंदिर परिसरात अस्वल बसली ठाम मांडून; परिसरातील गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या चिंचोना गावातील गायमुख महादेव मंदिर परिसरात गेल्या काही दिवसांपासून अस्वलाचे सतत दर्शन होत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिर परिसर तसेच आसपासच्या शेतशिवारात हे अस्वल वारंवार फिरताना दिसत असल्याने नागरिकांचे बाहेर निघणे, व शेतात जाणे रोजच्या कामानिमित्त घराबाहेर पडणे अत्यंत कठीण झाले आहे.सातपुड्याच्या पर्वतात गायमुख महादेव हे धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असल्याने येथे नागरिक, भाविक, पर्यटक यांची नेहमीच वर्दळ असते. मात्र, जंगलातून खाली उतरणाऱ्या या अस्वलामुळे अलीकडे सर्वच हालचाली थंडावल्या आहेत. सकाळ-संध्याकाळ तर सोडाच, दिवसाढवळ्या देखील परिसर निर्जन झाल्यासारखा दिसत आहे. महिला, वृद्ध, विद्यार्थ्यांना तर बाहेर पडण्यास अधिकच भीती वाटत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.गावातील शेतकरी वर्ग या अस्वलीमुळे भयभीत झाले आहे . शेतात पिकांची पाहणी व पाण्याचे नियोजन, जनावरांची काळजी या दैनंदिन कामांत मोठा अडथळा निर्माण झाला आहे. काही ठिकाणी अस्वलाने टाकलेले पाऊलखूण व झाडांवरचे ओरखडेही आढळल्याने नागरिक भयभीत झाले आहेत.स्थानिक नागरिकांनी वन खात्याचे लक्ष वेधत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अस्वलाचा बंदोबस्त करून नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, तसेच परिसरात गस्त वाढवावी, अशीही मागणी होत आहे.दरम्यान, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीची दखल घेतली नाही किंवा सुरक्षितरीत्या जंगलात परत पाठविणे याबाबत अद्याप ठोस कारवाई केली नसल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.

# निवडणुकीसाठी तयार केलेले चेकपोस्ट बेवारस




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चांदुर बाजार**

नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया वेगाने पुढे जात असताना, निवडणूक आयोगाने शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी स्थिर निगराणी पथकाच्या (एसएसटी) चेकपोस्ट उभारण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मोर्शी रोडवरही चेकपोस्ट उभारण्यात आला . मात्र शनिरी सकाळी ८.२१ वाजता भेट दिली असता या चेकपोस्टची स्थिती पाहून नागरिक अक्षरशः चकित झाले. चेकपोस्टवर एकही कर्मचारी उपस्थित नव्हता, त्यामुळे निवडणुकीकरिता तयार केलेले मोर्शी रोडवरील चेकपोस्ट बेवारस झालेले दिसले.

चेकपोस्ट संपूर्ण मंडप रिकामा तर त्या ठिकाणी . ना अधिकारी, ना कर्मचारी, ना कोणतेही वाहन तपासणीचे साहित्य पेंडॉलमध्ये केवळ 'नगरपरिषद निवडणूक स्थिर निगराणी पथक' असे लिहिलेला फलक मात्र तसाच लटकत होता. या ठिकाणावरून जाणारे नागरिक हा पेंडॉल पाहत, थांबत, फलक वाचत, मात्र कर्मचार्यांची हालचाल नसल्याचे बघत पुढे निघून जात होते. निवडणुकीदरम्यान मतदारांना प्रलोभन देणे, अनधिकृत रोख रक्कम किंवा साहित्य वाहतूक, दारू वितरण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थिर निगराणी पथकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे या पथकांच्या कार्यक्षमतेवर निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. दिवसाढवळ्या अशा महत्त्वाच्या चेकपोस्टवर एकही कर्मचारी नसल्याचे चित्र उघड होताच नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली. हा पेंडॉल फक्त नावापुरता उभारला आहे की काय?, अशा प्रकारचे प्रश्न नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. साधारणपणे सकाळीच वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू होते. या वेळेला चेकपोस्ट सक्रिय असणे आवश्यक असतानाच पथक पूर्णपणे अनुपस्थित असल्याने प्रशासनाच्या तयारीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवडणूक काळात वाहतूक तपासणी, संशयास्पद हालचालींवर नियंत्रण, अवैध पैसा किंवा दारू वाहतूक रोखणे आदींसाठी या पथकांना २४ तास ड्यूटीवर राहण्याचे निर्देश असतात. मात्र प्रत्यक्षात मोर्शी रोडवरील चेकपोस्ट पूर्णपणे बेवारस अवस्थेत दिसला.

# तिवसा तालुक्यात पुन्हा भूकंपाचे धक्के : शिवनगाव दोन दिवसांत दोनदा हादरले, ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील शिवनगाव परिसर पुन्हा एकदा भूकंपाने हादरला आहे. सलग दुसऱ्या दिवशीही रात्री सौम्य भूकंपाचे धक्के जाणवल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.समस्त गावकरी रात्रभर रस्त्यावर बाहेरच थांबून होते.



काल मध्यरात्री सुमारे १२ वाजताच्या सुमारास हे धक्के स्पष्टपणे जाणवल्याची माहिती स्थानिकांनी दिली. अचानक घरं हलल्यासारखे जाणवताच नागरिक घाबरून बाहेर धावले. काही वेळ गावकरी रात्री रस्त्यावरच थांबून सुरक्षिततेची खात्री करत होते.शिवनगावात काही महिन्यांपूर्वीही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते, तर जवळील शिरजगाव परिसरातही अशाच घटना पूर्वी घडल्या आहेत. पुन्हा सलग दोन दिवस धक्के जाणवल्याने परिसरात भीतीचे सावट पसरले असून ग्रामस्थ प्रशासनाने या घटनांची गंभीर दखल घेण्याची मागणी करत आहेत.स्थानिकांच्या मते, रात्री उशिरा जाणवलेल्या धक्क्यांमुळे मुले, महिलांमध्ये मोठी भीती निर्माण झाली असून अनेकांनी घराबाहेरच वेळ घालवला. अद्याप प्रशासनाकडून अधिकृत तीव्रता किंवा केंद्रबिंदूची माहिती उपलब्ध नाही.ग्रामस्थांनी भूगर्भ विभाग व जिल्हा प्रशासनाने तात्काळ तपास करून नागरिकांना खात्रीशीर माहिती द्यावी, अशी मागणी केली आहे.

# चिन्हाविनाच झाला अपक्ष उमेदवारांचा प्रचार सुरु; २६ नोव्हेंबरला चिन्ह वाटप

## अपिल अर्जाच्या माघारीची २५ पर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

निवडणुकीमध्ये नगरपालिकेच्या इच्छुक उमेदवारांना तब्बल सहा दिवस निवडणूक चिन्हाविना प्रचार करावा लागणार आहे. वैध-अवैध ठरलेल्या अर्जावरील अपिलाचा निकाल २५ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. त्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यामुळे अपक्ष असलेल्या उमेदवारांना २६ नोव्हेंबर रोजी चिन्ह मिळणार असून, त्यानंतर चिन्हासह प्रचार करण्यासाठी केवळ चार दिवस मिळणार आहेत.



नगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू आहे. उमेदवारांचे अर्ज पात्र आणि अपात्र ठरल्यानंतर २१ नोव्हेंबर ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख होती. जिल्ह्यातील ४२ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत. उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतर अपिलातील अर्जावर निकाल लागेपर्यंत अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.२६ नोव्हेंबर रोजी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यानंतर ३० नोव्हेंबर रोजी प्रचार संपणार आहे. त्यामुळे केवळ चार दिवसांमध्ये अपक्ष उमेदवारांना प्रचार करावा लागणार आहे.

### चिन्हावर प्रचार फक्त चार दिवस

अपक्षांच्या चिन्हांचे वाटप २६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे २७ ते ३० नोव्हेंबरपर्यंत म्हणजे फक्त चार दिवस चिन्हावर प्रचार करता येणार आहे. मंगळवार, २ डिसेंबर रोजी निवडणुकीचे मतदान होणार आहे.

### पहिल्यांदाच असा निर्णय

कोणत्याही निवडणुकीत माघारीच्या दिवशीच चिन्हांचे वाटप केले जाते. त्या दिवसापासून प्रचार साहित्यावर चिन्हांची मोहोर उमटवली जाते. पण पहिल्यांदाच एवढा मोठा गॅप असून, माघारीनंतरचे सहा दिवस अपक्षांना फक्त आपल्या नावाचा प्रचार करावा लागणार आहे.अपिलात दाखल केलेल्या दाव्यांचा निकाल २५ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. या दिवसापर्यंत माघारीची अंतिम मुदत असल्याने २६ तारखेला अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप केले जाईल. त्यानंतर खऱ्या प्रचाराला सुरुवात होईल.

# प्रचारासाठी धावाधाव; विकासाचे मुद्दे मात्र गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

नगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून, राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उमेदवार प्रचारासाठी रस्त्यावर सक्रिय झाले आहेत. प्रचाराला वेळ कमी मिळत असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. शहरातील गल्ली-बोळांत



उमेदवारांच्या भेटीगाठी पदयात्रा आणि सोशल मीडिया मोहिमा वेगाने सुरूआहेत. तथापि, या धामधुमीत एक गोष्ट ठळकपणे जाणवत आहे.प्रचारात विकास' हा मुख्य मुद्दा मात्र गायब झालेला दिसत आहे. उमेदवारांना सगळे सोयरे व मित्रांची निवडणुकीच्या निमित्ताने आठवण येत आहे. अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, आरोग्य आणि शिक्षण या नागरिकांच्या मुख्य गरजांवर बोलण्यास अनेक उमेदवार टाळाटाळ करताना दिसत आहेत.मोठमोठी आश्वासने, भावनिक नारे आणि पक्षीय समीकरणे पुढे येत असताना शहराच्या खऱ्या विकासाचा अजेंडा कुठेतरी हरवलेला आहे, असे दिसत आहे.प्रचारात धावपळ, उमेदवारांची घराघरातील धडक भेटी आणि कार्यकर्त्यांची धावपळ यामुळे शहराचे वातावरण निवडणुकीच्या रंगात बुडाले आहे. मात्र, मतदारांमध्ये एक प्रश्न ठळकपणे उमटत आहे. विकासाच्या नावाने मत मागताय, पण विकासाचाच मुद्दा कुठे आहे? कमी वेळ, वाढलेली स्पर्धा आणि बहुरंगी लढती यामुळे निवडणूक यंदा रोचक ठरणार आहे.

# 'हिंद की चादर सिख पंथाचे नववे गुरु तेग बहादूर साहेब यांना विनम्र अभिवादन

## बोले सो निहाल - सत श्री अकालचा एकच जयघोष वाहे गुरु वाहे गुरुच्या अखंडित नामस्मरणात भावीकभक्त तल्लीन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

भारतीय संस्कृतीचा अभ्यास करताना काही व्यक्तिमत्वे अशी भेटतात की ज्यांचे जीवन विचार, आणि बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण मानव जातीसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्वापैकी एक म्हणजे शीख धर्माचे नववे धर्मगुरु ' गुरु तेग बहादूर ' होते. २४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारत देश हा त्यांच्या बलिदानाची, त्यांच्या मूल्यांची आणि त्यांच्या अद्वितीय मानवतावादी विचारांची स्मृती जागवतो. हा दिवस केवळ एका धार्मिक गुरुच्या हौतात्म्याचा दिवस नाही, तर मानवी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्म गौरवासाठी प्राणार्पण करणाऱ्या महापुरुषाचा वैश्विक स्मरण दिन आहे.गुरु तेग बहादूर यांनी समतेवर आधारित समाज बांधण्यासाठी श्रद्धेची भक्ती, क्षमेचे दर्शन आणि न्यायाची भावना जोपासली. त्यांच्या शिकवणींमध्ये भीतीवर मात हे केंद्रस्थानी होते. स्वतः च्या ग्रंथात त्यांनी लिहिले आहे की जो डरता नही अर्थातच जो दुसऱ्याला घाबरवत नाही, तोच खरा ज्ञानी आणि मुक्त आहे. श्री. गुरु तेग बहादूर यांचा ३५० व्या शहीद दिवस निमित्याने अमरावती येथील बुटी प्लॉट स्थित गुरुद्वारा श्री गुरुसिंघ सभा च्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या निमित्याने राजकमल चौक येथे श्लोक महला नववा का पठन एवं नाम सिमरन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निसर्गाच्या खुल्या वातावरणात आयोजित या कार्यक्रमात श्री गुरु साहिब यांचे जीवन दर्शन व जीवन कार्याची महती सरळ, साध्या - सोप्या शब्दांत सांगितली जातं असताना सर्व उपस्थित सिख, पंजाबी, सिंधी, सिखलीगर समाजाचे ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी, युवक - युवती तल्लीन झाले असल्याचे दृश्य यावेळी दिसून आले. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवाधिकारांचे संरक्षण, करुणा, त्याग आणि साहसाचे प्रतीक नववे पातशाह श्री गुरु तेग बहादूर जी आजही संपूर्ण मानवतेसाठी दीपस्तंभ आहेत. चला, आपण आपल्या परिवारासह या पवित्र भूमीवर श्रद्धेने नतमस्तक होऊन या दिव्य आयोजनाचा भाग बनत यावेळी आबालवृद्धानीं महला नववा का पठन एवं नाम सिमरन मध्ये सहभाग नोंदवला होता. ' धर्म म्हणजे इतरांचा धर्म नष्ट करणे नव्हे, तर प्रत्येकाच्या श्रद्धेचा सन्मान करणे होय '. गुरु तेग बहादूर जी यांचे स्मरण केवळ धार्मिक नाही तर ते राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी वारसा आहे.आजचा दिवस हा केवळ त्यांच्या शहादतीचा स्मरणदिन नाही, तर त्यांच्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा दिवस आहे. या महान विभूतीला विनम्र अभिवादन करण्यासाठी गुरुद्वारा श्री गुरुसिंघ सभा, अमरावती चे अध्यक्ष - अमरज्योत सिंघ जग्गी, सचिव - डॉ. निक्कू खालसा, कार्यकारी अध्यक्ष - रवींद्र सिंघ उर्फ बिट्टूसेठ सलूजा, कोषाध्यक्ष - रतनदीप सिंघ बग्गा, महासचिव - राजेंद्र सिंघ उर्फ कालू सेठ सलूजा, दिलीप सिंघ बग्गा, गुरुविंदर सिंघ बेदी, माजी महापौर - रीना नंदा, गुरुविंदर सिंघ उर्फ लाठीसेठ नंदा आदिसहित अमरावती येथील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच आमंत्रित सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

# निवडणूक चिन्ह की भाजी मार्केट?कुणी हिरवी तर कुणी ढोबळी मिरची घ्या, कुणास भुईमूग तर कुणास नारळाची बाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २४अमरावती**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांकरिता निवडणूक आयोगाने चिन्हांची यादी जाहीर केली आहे. राष्ट्रीय मान्यताप्राप्त आणि राज्यस्तरीय पक्षांसाठी असलेल्या राखीव चिन्हांव्यतिरिक्त अपक्ष उमेदवारांसाठी तब्बल १९४ मुक्तचिन्हे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.



उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर २६ नोव्हेंबर रोजी या चिन्हांचे वाटप होणार आहे. या चिन्हांमध्ये उशी, कपबशी यांसारख्या रोजच्या वापरातील वस्तूंपासून ते ट्रॅक्टर, क्रेन आणि मोबाइल यांसारख्या आधुनिक वस्तूंचा समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करणाऱ्या अपक्ष आणि अमान्यताप्राप्त पक्षांच्या उमेदवारांसाठी मुक्तचिन्हांची यादी उपलब्ध करण्यात आली आहे. आयोगाने निश्चित केलेल्या निकषांनुसार, ही चिन्हे उमेदवारांना उपलब्ध असतील. ही चिन्हें नागरिकांना सहज लक्षात येतील अशा वस्तू, प्राणी, फळे, भाज्या आणि विविध साधने या स्वरूपातील आहेत.

### उमेदवारी अर्जात तीन चिन्हांची केली मागणी

अपक्ष उमेदवारांना उमेदवारी अर्जदाखल करताना उपलब्ध असलेल्या १९४ मुक्तचिन्हांपैकी तीन चिन्हे त्यांच्या पसंतीक्रमानुसार नमूद करावी लागतात.पहिली मागणी पूर्ण न झाल्यास दुसरी किंवा तिसरी पसंती विचारात घेतली जाते. अनेक उमेदवारांनी एकाच चिन्हाची मागणी केल्यास, चिन्हाचे वाटप लॉटरी पद्धतीने केले जाते.

### खाण्यापिण्याचीही चिन्हे

मतदारांच्या दैनंदिन जीवनातील खाद्यपदार्थ आणि पेयाशी संबंधित चिन्हेही मुक्तचिन्हांमध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत, जे मतदारांचे लक्ष वेधून घेण्यास मदत करतात. सफरचंद, द्राक्षे, अननस, बिस्कीट, ब्रेड टोस्टर, आइस्क्रीम, केक, नारळ, कपबशी, टोकरी आदी चिन्हे आहेत.

### वाहने, इलेक्ट्रॉनिक वस्तूंची अनेक चिन्ह उपलब्ध

आधुनिक युगातील वाहने आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणेही मुक्तचिन्हांमध्ये समाविष्ट आहेत. यात ट्रॅक्टर, ऑटो रिक्षा, ट्रक, क्रेन, कॅमेरा, संगणक, मोबाइल फोन, एअर कंडिशनर, प्रेशर कुकर, वॉल-फॅन, व्हॉल्व्ह आदी चिन्हांचा समावेश आहे.

# अनधिकृत प्रचाराला चाप; जाहिरातींचे प्रमाणीकरण करणे आवश्यक; माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील १० नगर परिषद व दोन नगरपंचायत साठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या निवडणुकीत सर्व उमेदवारांना सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रचाराच्या प्रमाणन व सनियंत्रण समितीच्या माध्यमातून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. प्रमाणीकरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि.९ ऑक्टोबर २०२५ च्या राजपत्रान्वये सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित, प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकविषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यू-ट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, संकेतस्थळे, सोशल मीडिया आदींचा समावेश होतो.

### उमेदवारांना इथे करावा लागणार अर्ज

उमेदवारांना आपला प्रचार करण्यासाठी विविध माध्यमाचा उपयोग करतात. याच माध्यमावर जाहिराती प्रचारित करण्यायाठी उमेदवारांना प्रस्तावित जाहिरात प्रसारित, प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी समितीकडे प्रमाणनासाठी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

# आता पोस्ट ऑफिस थेट तुमच्या खिशात; 'डाक सेवा २.०'मुळे मिळणार सर्व सुविधा

## रांगेत ताटकळणे थांबणार : मोबाइल ॲपद्वारे पार्सल बुकिंग, ट्रॅकिंग, ऑनलाइन तक्रार नोंदविता येणार

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक (विशेष)**
**दि.२४अमरावती**

भारतीय टपाल खात्याने 'डाक सेवा २.०' हे नवीन मोबाइल ॲप लाँच केले आहे. या सुविधांचा वापर १३ नोव्हेंबरपासून सुरू झाला आहे. या ॲपमुळे टपाल कार्यालयात जाण्याची गरज संपली असून, पोस्टाच्या सर्व महत्त्वाच्या सेवा आता मोबाइलवर उपलब्ध झाल्या आहेत. पोस्ट ऑफिसची सेवा तुमच्या खिशात मिळणार, अशी माहिती पोस्ट विभागाने दिली आहे.

पोस्टाच्या विविध योजना सुरक्षितताः आणि चांगला परतावा देणाऱ्या असल्याने या ॲपद्वारे सर्व व्यवहार घरबसल्या करता येण्याची मोठी सोय आहे. त्यामुळे नागरिकांना पोस्ट ऑफिसच्या रांगा, फॉर्म, कागदपत्रांची धावपळ यापासून मुक्तता मिळणार आहे. पोस्ट ऑफिसमध्ये अनेकदा ग्राहकांची गर्दी दिसून येते. सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत ऑफिस खुले राहत असल्याने कामे होत नाही.

### एकाच ॲपमध्ये सुविधा

१) तक्रार नोंदणी व स्टेटस स्टेटस तपासणी




कापलेन्ट मॅनेजमेंट सिस्टमचा समावेश करण्यात आला आहे. पोस्ट सेव्हिंग अकाउंट माहिती खात्याची माहिती आणि व्यवहार तपासण्याची सोय. डिजिटल सेवा एकाच ॲपमध्ये पार्सल बुकिंग, ट्रेकिंग, पोस्टेज दर, तक्रार नोंदवणे ह्या सर्व सेवा 'डाक सेवा २.०' ॲपमध्ये सहज उपलब्ध आहेत.

२) पत्ते अधिक अचूक ३ ओळखण्यासाठी खास डिजिटल कोड आहे. ज्यामुळे वितरणात गती आणि अचूकता वाढते. ॲपमुळे पोस्ट ऑफिसमधील कामाचाही भार कमी होणार आहे.

### या आहेत प्रमुख सुविधा

पार्सल ट्रॅकिंग : पाठवलेल्या स्पीड पोस्ट किंवा पार्सलची स्थिती त्वरित पाहता येणार.

मनी ऑर्डर : पोस्टात न जाता मोबाइलवरून मनी ऑर्डर पाठवण्याची सोय.

स्पीड पोस्ट फी कॅल्क्युलेटर : कोणत्या सेवेसाठी किती शुल्क लागेल याची माहिती उपलब्ध.

इन्शुरन्स : पोस्टल लाइफ इन्शुरन्स (पीएलआय / आरपीएलआय) पेमेंट विमा हप्ते सहज भरण्याची सुविधा.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत